किंमत रु. ३०/-
पृष्ठे ४४
वर्ष : ६५ अंक : ९
पुणे.

# जीवन शिक्षण

डिसेंबर २०२०

Jeevan Shikshan
Vol. : 65 Issue : 9
December 2020
Price ₹ 30
Pune.



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
जेवणाचे ४ नियम – चमच्याचा वापर, धुतलेले हात,
आपलेच ताट व टिफिन आणि ६ फुटांचे अंतर.
कोरोनापासून
वाचायचे आणि वाचवायचे आहे.
एक आदर्श उदाहरण बनायचे आहे.
६ फूट
आदर्श आणि मिसालचे म्हणणे ऐकू या.
सोबत राहून कोरोनाला
हद्दपार करू या.


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
जर वाचावे वाटते कोरोनापासून
तर ६ फुटांचे अंतर ठेवू या इतरांपासून.
कोरोनापासून
वाचायचे आणि वाचवायचे आहे.
एक आदर्श उदाहरण बनायचे आहे.
६ फूट
आदर्श आणि मिसालचे म्हणणे ऐकू या.
सोबत राहून कोरोनाला
हद्दपार करू या.


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
शिंक आणि खोकल्यासाठी करा वापर कोपराचा,
उपयोग होईल तुम्हांला रुमालाचा.
कोरोनापासून
वाचायचे आणि वाचवायचे आहे.
एक आदर्श उदाहरण बनायचे आहे.
आदर्श आणि मिसालचे म्हणणे ऐकू या.
सोबत राहून कोरोनाला
हद्दपार करू या.


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मास्कला नका बनवू कानातले व हार.
मास्कने नाक आणि तोंड झाकणे
गरजेचे आहे फार.
कोरोनापासून
वाचायचे आणि वाचवायचे आहे.
एक आदर्श उदाहरण बनायचे आहे.
आदर्श आणि मिसालचे म्हणणे ऐकू या.
सोबत राहून कोरोनाला
हद्दपार करू या.

# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

वर्ष ८५ डिसेंबर २०२० अंक ९ वा



❖ प्रवर्तक :
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन

❖ प्रकाशक :
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

❖ प्रकाशन सल्लागार समिती :

राहुल द्विवेदी (भा.प्र.से.), *संचालक तथा संपादक* अध्यक्ष

विकास गरड, *प्र. प्राचार्य, आय.टी. व सहा. संपादक प्रसार माध्यम*

डॉ. कमलादेवी आवटे, *प्राचार्य, समता विभाग* सदस्य

डॉ. शोभा खंदारे, *प्राचार्य, जि. शि. व प्र. सं., पुणे.* सदस्य

अश्विनी मुसळे-काळसर्पे *सहा. संचालक, लेखा* सदस्य

डॉ. दत्तात्रय थिटे, *वरिष्ठ अधिव्याख्याता,* सदस्य
रा. शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.

वर्षाराणी भोपळे, *वरिष्ठ अधिव्याख्याता,* सदस्य
रा. शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.

❖ डॉ. किरण धांडे, *वरिष्ठ अधिव्याख्याता,* सदस्य-सचिव
रा. शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.

❖ निर्मिती सहायक :
अनुराधा चव्हाण, *विषय सहायक, प्रसार माध्यम*
रा. शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.



❖ मुद्रक : रुना ग्राफिक्स, सिंहगड रोड, पुणे ४१.

❖ प्रती : ५७,५००

❖ मूल्य : रु. ३०/- वार्षिक वर्गणी रु. ३००/-


## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| ❖ संपादकीय | – | ४ |
| ❖ विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिदिन | अनिता जावळे | ५ |
| ❖ समाज प्रबोधक 'संत गाडगेबाबा' | मंगल डोंगरे | ७ |
| ❖ शिक्षणाच्या नव्या वाटा... | नंदा भोर | ११ |
| ❖ नवी पहाट | अर्चना शिरसाट | १३ |
| ❖ शाळा उघडताना शिक्षकांसमोरील आव्हाने | हेरंब कुलकर्णी | १५ |
| ❖ शिक्षण : कोविड काळातले आणि नंतरचे | गीता महाशब्दे | १७ |
| ❖ दैनंदिनी लिहायचीच नाही... | राजीव तांबे | २१ |
| ❖ भाषेतील गमतीजमती | माधव राजगुरू | २३ |
| ❖ चला गोष्ट सांगू या... | फारूक काझी | २६ |
| ❖ आमची दुनिया बोलक्या बाहुल्यांची... | दीपाली बाभुळकर | ३० |
| ❖ मुलांचे भावविश्व आणि बालसाहित्य | समाधान शिकेतोड | ३५ |
| ❖ भित्तिपत्रकातून आपत्ती व्यवस्थापन | रवींद्र जंगम | ३७ |
| ❖ माझी शाळा माझे उपक्रम | भारती ओंबासे | ४० |
| ❖ प्रिय संपादक | – | ४२ |



**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, जीवन शिक्षण,**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in



*या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय ....



सन २०२० च्या शेवटच्या महिन्याच्या अंकाचे हे संपादकीय आणि माझे या निमित्ताने तुमच्याशी पहिले हितगुज. २०२० हे संपूर्ण वर्ष जगासाठी आव्हानात्मक ठरले. 'न भूतो न भविष्यति' अशा परिस्थितीला आपण या वर्षात सामोरे गेलो आणि अजून जात आहोत. जगभरातील सर्व व्यवहार ठप्प पडू शकतात अशी कधी स्वप्नातही कल्पना केली नव्हती, ते आपण कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे अनुभवले आहे. कधीच बंद न होणाऱ्या शाळा गेले ८-९ महिने बंद आहेत. आता जनजीवन बऱ्यापैकी सुरळीत सुरू झाले आहे, पण मुलांच्या आरोग्याचा प्रश्न महत्त्वाचा असल्याने शाळा सुरू करून आपण मुलांच्या बाबतीत जोखीम पत्करणे सयुक्तिक होणार नाही. त्यामुळेच आपण स्थानिक परिस्थितीचे अवलोकन करून, स्थानिक प्रशासनाने शाळा सुरू करण्याबाबत निर्णय घ्यावा असे कळविले आहे. आमचा त्यांच्या निर्णयाला पाठिंबाच असणार आहे.

या सर्व अनिश्चिततेच्या परिस्थितीत आपल्या विभागाने, मा. शिक्षण मंत्री व मा. अपर मुख्य सचिव यांच्या मार्गदर्शनाने नक्कीच प्रशंसनीय काम केले आहे, हे मागील आठ महिन्यांच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला असता दिसून येते. शाळा जरी बंद होत्या, तरी शैक्षणिक सत्राच्या प्रत्येक टप्प्यावर सुव्यवस्थितरीत्या इंटरनेट, दूरदर्शन, रेडिओ या माध्यमांचा योग्य उपयोग करून घेत मुलांचे शिक्षण सुरू ठेवण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत. त्याला विद्यार्थी व पालक यांच्याकडून उत्तम प्रतिसाद पण मिळाला आहे. त्याचे सकारात्मक परिणाम सुद्धा समोर येत आहेत. कोविड-१९ च्या या संकटाने उद्याचे जग, उद्याची शिक्षणाची माध्यमे आणि उद्याचे शिक्षण कसे असेल याची जाणीव आजच करून दिली आहे. त्यामुळे भविष्यातील शिक्षणाची तयारी करण्याची संधी शिक्षण विभागाला मिळाली आहे. जी सूट गुगल क्लासरूमच्या माध्यमातून असे पाऊल टाकणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. ऑनलाईन शिक्षणाच्या विविध पद्धती शिक्षक आत्मसात करीत आहेत. तंत्रज्ञानातील नावीन्यपूर्ण प्रयोग व असामान्य कार्य यांमुळे जगातील सर्वोत्तम शिक्षकांच्या क्रमवारीत अव्वल ठरलेले सोलापूर जिल्हा परिषदेचे शिक्षक श्री. रणजितसिंह डिसले यांना युनेस्को व लंडनस्थित वर्की फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा 'ग्लोबल टिचर पुरस्कार' प्राप्त झाला आहे. ही बाब केवळ राज्यासाठीच नव्हे, तर देशासाठीही निश्चितच अभिमानाची आहे.

येणारे वर्ष नक्कीच आपल्या सर्वांसाठी आशादायी असेल. बंद असलेल्या शाळा पूर्ववत सुरू होतील. दि. २३ नोव्हेंबर २०२० पासून राज्यात, विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या आरोग्याची काळजी घेऊन इयत्ता नववी ते बारावीचे वर्ग सुरू झाले आहेत. कोविड-१९ चे हे संकट तूर्तास कमी होताना दिसत असले तरी संपेल असे वाटत नाही. शाळा नियमित सुरू झाल्यानंतर पुन्हा नव्या समस्यांना आपल्याला सामोरे जावे लागेल, त्याची पूर्वतयारी आपण करू या आणि येणारे नवीन वर्ष सर्वांसाठी आरोग्यदायी, उत्कर्षाचे असेल याच सदिच्छांसह आपणां सर्वांना २०२१ या नवीन वर्षासाठी हार्दिक शुभेच्छा!

**राहुल द्विवेदी** (भा.प्र.से.)
संपादक, जीवन शिक्षण

# विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिदिन

**अनिता जावळे**
जि. प. प्रा. शाळा बोरगाव काळे, जि. लातूर, भ्रमणध्वनी : ९५४५०५०२९२

*भारतीय संविधानाचे शिल्पकार, उच्चविद्याविभूषित, अर्थतज्ज्ञ, कायदेपंडित, बहुजन समाजात आत्मतेज जागृत करणारा बंडखोर नेता, समाजशास्त्रज्ञ, लोकशिक्षक, पत्रकार असे चतुरस्र व्यक्तिमत्त्व असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने त्यांचे शिक्षणविषयक विचार आणि त्यांच्या स्वप्नातील भारत याविषयी....*

*चला अभिवादन करू या,*
*त्या महामानवाला,*
*होता सिंहासारखा भीम माझा,*
*नव्हती त्याला कोणाची भीती,*
*तलवारीची गरज नव्हती,*
*पुरेशी होती लेखणी*
*अरे होऊन गेली वर्षे जरीही किती,*
*आजही बोलावते आम्हां त्यांची लेखणी!*

भारताला स्वातंत्र्य सहजासहजी नाही मिळाले. त्यासाठी अनेकांनी संघर्ष केला आहे आणि प्राणांची आहुती दिली आहे, याला भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास साक्षी आहे. १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले आणि २६ जानेवारीला भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनले. लोकशाही राज्यपद्धती सुरू झाली. भारताची घटना लिहिली गेली. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान फार मोलाचे आहे. घटना तयार करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समोर अनेक समस्या होत्या, अनेक प्रकारच्या वैचारिक संघर्षातून त्यांना जावे लागले होते. भारत देश अनेक जाती, धर्म, प्रांत, भाषा, प्रदेश यांनी विखुरलेला आहे, त्यामुळे घटना तयार करताना घटना समितीला या सगळ्यांचा विचार करावा लागला.



आज भारताला स्वातंत्र्य मिळून ७३ वर्षे झाली. डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या स्वप्नातील भारत स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, धर्मनिरपेक्षता या मूल्यांवर आधारित होता. समता हे मूल्य आपणांस भारतीय संविधानाने दिले आहे. खरेच हे मूल्य रुजले आहे का? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारत साकार होत आहे का? याचे उत्तर खेदाने नकारार्थी द्यावे लागत आहे. आजही ज्या प्रमाणात समाजात सुधारणा होणे आवश्यक आहे, त्या प्रमाणात ती झालेली दिसत नाही. महिलांवरील अत्याचार वाढले आहेत, बालमजुरी वाढत आहे, शिक्षणही सर्वांपर्यंत पोहोचले नाही. लोकशाहीचे मूल्य रुजविण्यासाठी शिक्षण हे खूप महत्त्वाचे माध्यम आहे. शिक्षणामुळेच आमूलाग्र बदल आणि परिवर्तन होते हे निश्चित.

६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्ली येथे महापरिनिर्वाण झाले. त्यांचा स्मृतिदिन साजरा करीत असताना त्यांचे विचार, कार्य याबाबत आणि भविष्यातील माझा भारत देश कसा असायला हवा यावर नक्कीच विचार होणे आवश्यक आहे म्हणून हा शब्दप्रपंच आहे.



१ डिसेंबर : पद्मविभूषण काकासाहेब कालेलकर जन्मदिन १८८५



आधुनिक भारताच्या इतिहासातील युगप्रवर्तक नेता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, भारतीय राजघटनेचे शिल्पकार असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू येथील लष्करी छावणीत सुभेदार रामजी मालोजी सकपाळ (आंबावडेकर) व भीमाबाई यांच्या पोटी झाला. भीमराव हे त्यांचे १४ वे अपत्य होते. त्यांचे गाव महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील आंबवडे हे होय. पुढे ते सातारा येथे स्थायिक झाले, नंतर त्यांचे वडील मुंबईला आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सुरुवातीचे शिक्षण दापोली, सातारा येथे झाले. मुंबईत त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण झाले.

उच्चविद्याविभूषित, अर्थतज्ज्ञ, कायदेपंडित, बहुजन समाजात आत्मतेज जागृत करणारा बंडखोर नेता, समाजशास्त्रज्ञ असे चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशिक्षक, पत्रकार म्हणूनही कार्य केले. 'बहिष्कृत भारत'चे ते संपादक होते. 'मूकनायक', 'समता', 'जनता' या पत्रांमधून अनेक अग्रलेख त्यांनी लिहिले, अर्थात ही सर्व नियतकालिके त्यांच्या मानवमुक्तीच्या चळवळीची मुखपत्रे होती. बहुजनांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय यांवर आधारित लोकशाही समाज निर्मितीसाठी संघर्ष करावा, आपल्या समाजिक व धार्मिक हक्कांबरोबरच त्यांनी राजकीय हक्कही मिळवावेत, वैचारिक प्रबोधन होऊन समाज संघटित व्हावा व त्याने सर्वंकष संघर्षासाठी सिद्ध व्हावे असे विचार त्यांनी मांडले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखातून शिक्षणविषयक विचार मांडले. २० जून १९४६ रोजी त्यांनी सिद्धार्थ कॉलेज सुरू केले. तसेच औरंगाबाद येथे मिलिंद कॉलेज स्थापन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अभ्यासू आणि वाचनाचे प्रचंड वेड असलेले व्यक्तिमत्त्व. जगात ही एकमेव व्यक्ती असेल ज्यांनी पुस्तकांसाठी राजगृह बांधले.

ज्याप्रमाणे उपासमारीने शरीर पोषण कमी झाल्यास माणूस कमजोर होऊन अल्पायुषी होतो, त्याप्रमाणे शिक्षणाच्या अभावामुळे तो निर्बुद्ध राहिल्यास जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम बनतो. प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी आपले रक्षण करण्याची शक्ती उत्पन्न होणे गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षणाला दुसरा पर्याय असू शकत नाही परंतु सरकार ही जबाबदारी स्वतः स्वीकारत नाही याचा उल्लेख ते आपल्या लेखात वारंवार करतात.

डॉ. परांजपे शिक्षण मंत्री असताना १९२० व १९२३ मध्ये दोन कायदे पास करण्यात आले. यातील पहिल्या कायद्यात शहरातील प्राथमिक शिक्षण स्थानिक म्युनिसिपालिटीच्या ताब्यात दिले, तर दुसऱ्या कायद्यात जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण स्थानिक म्युनिसिपालिटी व लोकल बोर्ड यांच्याकडे सोपवून देण्यात आले परंतु या दोन्ही कायद्यांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जोरदार आक्षेप घेतला. या कायद्यांमध्ये अनेक दोष आहेत, असे ठणकावून सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांना हा प्रकार घोड्याचे ओझे गाढवावर लादल्यासारखा वाटला होता. सरकार खर्चाला घाबरून शिक्षणाची जबाबदारी टाळते, पण त्यातून सर्वांत जास्त नुकसान बहुजनांचे होत आहे, हे ते जाणून होते.

**(पृष्ठ क्र. १० वर)**

# समाज प्रबोधक 'संत गाडगेबाबा'

**मंगल डोंगरे**

जि. प. प्राथ. शाळा, रायवाडी, जि. लातूर, भ्रमणध्वनी : ९८९०४६५०९०

*जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती असे आपण नेहमीच ऐकतो. संत गाडगेबाबा हेही असेच कल्याणकर्ते सत्पुरुष. समाजाला चुकीच्या मार्गावरून योग्य मार्गावर आणण्यासाठी त्यांनी अखंड प्रयत्न केले. अज्ञान, अंधश्रद्धा आणि अनिष्ट रूढींबाबत समाजाला त्यांच्या बोलीभाषेत समजावत समाज प्रबोधनाचे थोर कार्य करणाऱ्या संत गाडगेबाबांविषयी...*

महाराष्ट्राला संतांची भूमी म्हटले जाते. महाराष्ट्रामध्ये संत पुरुषांची एक विशेष परंपरा आहे. अनेक संतांनी, थोर पुरुषांनी, आपल्या वाणीने, कर्माने लोकांचे प्रबोधन केले. थोर समाज सुधारक संत गाडगेबाबांचे नाव त्यांच्या आगळ्यावेगळ्या कार्याने सर्वतोमुखी झाले.

राष्ट्रसंत गाडगेबाबांना लहानपणापासूनच भजन, कीर्तन ऐकण्याचा छंद होता. पुढे ते स्वत:च कीर्तन करू लागले. निसर्गात स्त्री-पुरुष हे दोनच भेद होते परंतु समाजात माणसांनी श्रेष्ठ-कनिष्ठ, उच्चनीच, गरीब-श्रीमंत अशी दरी निर्माण केली होती. यामुळे समाजाचे नुकसान होत होते. गरिबांची उपासमार होत होती. संत गाडगेबाबांना हे पाहवत नव्हते. ते विचार करीत, सुख कशात आहे? कोणता माणूस सुखी आहे? गरीब सुखी की श्रीमंत सुखी याचा शोध घेत ते फिरत होते. देशभर फिरताना अनेक गोष्टी संत गाडगेबाबांच्या लक्षात आल्या. त्यांना माणसांची सुखदुःखे जाणून घेण्याची संधी मिळाली. गरीब कष्टकरी माणूस मरेपर्यंत राबतो आहे. पुष्कळ पोरेबाळे झालेली. त्यांची होणारी हेळसांड, पुरेसे अन्न, वस्त्र, पुरेसा निवारा नाही. शिक्षण नाही. बरे-वाईट कळत नाही. घरातील कर्ता पुरुष व्यसनाधीन झालेला. कुटुंबाची दैना, स्वच्छतेअभावी रोगराई, औषधपाणी नाही अशी स्थिती. दारिद्र्याने पिचलेली माणसे पाहून संत गाडगेबाबा हताश झाले आणि सधन घरदार सोडून त्यांनी संसाराचा त्याग केला. संत गाडगे बाबांनी मानवधर्माच्या दिशेने आपली पावले उचलली. जनकल्याणाचे व्रत घेतले. समाजातील दुःख-दारिद्र्य, अंधश्रद्धा, अस्वच्छता, व्यसन याविषयी जनप्रबोधन करीत ते भटकू लागले. कीर्तनातून लोकहितोपदेश करू लागले.

संत गाडगे महाराज यांनी आपल्या वाणीने लोकांचे प्रबोधन केले. जनमानसावर आपल्या वागण्याबोलण्याचा ठसा उमटवत भोळ्याभाबड्या, गरीब, अशिक्षित, खेड्यापाड्यातील कष्टकरी, कामकरी लोकांना साध्या, सुलभ वाणीने आपलेसे केले. लोकांना ते आपले वाटू लागले.

भुकेलेल्यांना अन्न द्या, तहानलेल्यांना पाणी द्या, उघड्यानागड्यांना वस्त्र द्या, बेघरांना आसरा द्या, निराश झालेल्यांना हिंमत द्या, गरीब मुलांना शिक्षण द्या, बेरोजगारांना रोजगार द्या, गरीब तरुण-तरुणींची लग्ने करून द्या, अंधांना, पंगूंना मदत करा, रोग्यांना औषध द्या, मुक्या प्राण्यांना अभय द्या' हा संत गाडगेबाबांचा दहा कलमी संदेश म्हणजे मानव कुळाच्या उद्धाराचा खरा मंत्र आहे.

‘देव दगडात नाही, माणसांत पहा. गरिबांवर दया करा. जगाची सेवा करा. नवससायास करू नका. अंधश्रद्धा बाळगू नका. कर्जबाजारी होऊ नका. अज्ञान सोडा. आपली लेकरं शाळेत घाला, शिक्षण द्या. शहाण्यासारखे वागा’ असे तळमळीने संत गाडगेबाबा लोकांना सांगत. स्वत: अशिक्षित असूनही त्यांनी कीर्तन, भजनातून आपल्या वाणीने लोकांना खूप मोठा संदेश दिला व जीवनाचे तत्त्वज्ञान लोकांसमोर मांडले.



लोकसेवेचे जनजागृतीचे कार्य करण्याचा त्यांनी वसा घेतला. त्या काळी शिक्षणापासून वंचित समाज अंधश्रद्धेच्या विळख्यात सापडलेला होता.निरर्थक कर्मकांडात गुरफटून गेलेल्या समाजाला मुक्त करण्यासाठी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांनी समाज जागृतीसाठी ’कीर्तना’च्या माध्यमातून जनजागृती केली. संत गाडगेबाबांचे कीर्तन सवाल जबाबातून असे.

*शेंदूर माखोनिया धोंडा ।*
*पाया पडती पोरे रांडा (बायका) ।।*
*देव दगडाचा केला ।*
*गवंडी त्याचा बाप झाला ।।*
*सोडोनिया खऱ्या देवा ।*
*करी म्हसोबाची सेवा ।।*

संत गाडगेबाबा लोकांना सवाल विचारत, तुम्ही दिलेला नैवेद्य तुमचा देव खातो का? नैवेद्य कोण खातो ? देवापुढे ठेवलेला नैवेद्य कुत्रं खातं. लेकराबाळांना उपाशी ठेवता अन् दगडाच्या देवाला देता. मायबाप हो, जरा ऐका. दगडधोंडा पुजू नका. माणसांत देव पहा. देव दगडात नाही, तो माणसांत आहे. असे सवाल–जबाब करीत ते संवाद साधत. लोक गोंधळून जात, पण विचार करू लागत.

एका हातात फुटकं खापर, दुसऱ्या हातात खराटा, डोक्यावर चिंधोटी बांधलेली, फाटकेतुटके कपडे असा हा अवलिया महामानव मोहमाया सोडून समाजहितासाठी वणवण गावोगावी भटकत असे. ‘गोपाला गोपाला, देवकी नंदन गोपाला’ म्हणत आपल्या साध्या, सरळ, निर्भीड, सडेतोड भाषेतून, कीर्तनातून बुरसटलेल्या समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी अहोरात्र पायपीट करीत करीत त्यांनी उभा महाराष्ट्र पिंजून काढला. त्यांच्या अभूतपूर्व कर्तृत्वामुळे भारतवर्षाला त्यांची राष्ट्रसंत गाडगे महाराज म्हणून ओळख झाली.

संत गाडगे महाराज गरजवंतांसाठी, गरिबांसाठी काम करीत राहिले. कर्मयोगी गाडगेबाबांनी समाजाला लागलेली जुनाट विचारांची जळमटे काढून टाकण्यासाठी, समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी अहोरात्र भटकंती केली. खेडेगावात लोक अस्वच्छतेमुळे आजारी पडत, महामारीसारखे आजार होऊन गावेच्या गावे ओस पडत. अशिक्षित लोक घाणीमुळे, अस्वच्छतेमुळे आजार आला, असे न मानता तो देवाचा कोप समजून बाबाबुवा, गंडेदोरे, देव देव, कर्मकांड, नवस करून आपल्या अज्ञानाचे प्रदर्शन करीत. गरीब लोक सावकाराकडून कर्ज घेऊन कर्जबाजारी होतात. बकरे, कोंबडे कापून प्राण्यांची हत्या करतात हे गाडगेबाबांच्या लक्षात आले.

*नवस खोटा देव खोटा ।*
*रडतो भारत आपला तोटा ।।*
*तुका म्हणे कैसे आंधळे ।*
*हे जन विसरून गेले खऱ्या देवा ।।*

संत तुकोबांच्या अभंगांच्या दाखल्याची झलक गाडगेबाबांच्या कीर्तनात नेहमी येत असे. अंधश्रद्धाळू लोकांना जागृत करण्याचा त्यांचा नेहमी प्रयत्न असे.

नवस करणाऱ्यांना गाडगेबाबा कडक शब्दांत सुनावत, त्यांच्यावर टीका करीत. यात्रेतल्या देवाबद्दल गाडगे बाबा म्हणतात,

*जत्रा मे फत्रा बिठाया । तीरथ बनाया पानी ।।*
*दुनिया बडी दिवानी । पैसे की धुलधानी ।।*
*तीरथ जाव काशी जाव । चाहे जाव गया ।।*
*कबीर कहे कमालक । सबसे बड़ी दया ।।*

थोडेसे दान करून आपल्याला त्याचा मोठा फायदा होईल असा समज असणाऱ्या लोकांना गाडगेबाबा संत कबिरांच्या दोह्यातून समजावीत. समाजसेवा हीच खरी सेवा हा संदेश देत.

त्यांनी स्वच्छता अभियानाला चालना दिली. स्वत: हातात खराटा घेऊन गावे स्वच्छ केली. हे करीत असताना लोक त्यांच्या सोबत जोडत गेले आणि ग्राम स्वच्छता अभियान पुढे आले.

*स्वच्छतेची प्रत्येक कृती,*
*देई आरोग्यास गती ।*

गावात स्वच्छता असेल तर रोगराई पळून जाईल. अशी खात्री गाडगेबाबांना होती म्हणून त्यांनी समाज जागृतीचा आणि स्वच्छतेचा प्रसार व प्रचार केला. संपूर्ण देशात गावोगावी 'संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान' सुरू झाले. 'एक कदम स्वच्छता की ओर' 'स्वच्छ भारत अभियान' या अभियानाचे महत्त्व आपण जाणतो. गावे, शहरे स्वच्छ होताना दिसत आहेत. घंटागाड्या घेऊन जात सफाई कर्मचारी आपले कर्तव्य करताना दिसत आहेत. नागरिकांच्या विचारात बदल होताना दिसतो आहे. राष्ट्रसंत गाडगे बाबांचे आदर्श व समाजनिर्मितीचे स्वप्न पूर्ण होताना दिसते आहे.

अज्ञान अंधश्रद्धा आणि अस्वच्छता यांबद्दल जागरूकता निर्माण करणाऱ्या संत गाडगेबाबांचे तत्त्वज्ञान हे त्यांच्या प्रत्यक्ष कृतीतून प्रदर्शित होते. सामान्यांसाठी सुखी जीवनाचा मार्ग त्यांनी दिला. दिव्य ज्ञान दिले. श्रमदान आणि समाज सहभाग यातून संत गाडगेबाबांनी समाजातील अनेक कामे केली. एकजूट होऊन केलेले कार्य मानसिक समाधानासोबत सामाजिक समाधान देते.

'शिका, शहाणे व्हा' असे आपल्या कीर्तनातून तळमळीने सांगणाऱ्या संत गाडगेबाबांचे शिक्षणविषयक विचार,

*खर्चू नका देण्यासाठी पैसा ।*
*शिक्षणाला पैसा तोच द्या हो ।।*
*नको मंदिराची करावया भर ।*
*छात्र जो हुशार त्यास द्यावा ।।*
*नको धर्मकृत्ये पैसा खर्चुनिया ।*
*घेण्यासाठी विद्या तोच खर्चा ।।*
*शाळेहुनी नाही थोर ते मंदिर ।*
*देणगी उदार शाळेला द्या ।।*
*स्वतःचा उद्धार करा प्रयत्नाने ।*
*शक्तीने युक्तीने सुखी व्हावे ।।*

शिक्षणाने माणसाचे जीवन फुलते. आपण या जगात कशासाठी आलो हे कळते. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे. विद्या मिळवा. माणसाला शिक्षणाची गरज आहे असे सांगत संत गाडगेबाबांनी लोकशिक्षणाची चळवळ उभी केली. 'विद्या हे मोठे धन' आहे. लोक कल्याण, आर्थिक उन्नती, धार्मिक व सांस्कृतिक उन्नती अशा जाणिवांची जागृती शिक्षणातून व्हावी अशी संत गाडगेबाबांची धारणा होती. शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगताना संत गाडगेबाबा पोटतिडकीने म्हणतात 'तुमाले काला अक्षर भैंस बराबर होये.' म्हणून 'तुमाले सावकार लुबाडतेत, म्हणून शिक्षण घ्या. शहाणे व्हा.' ज्याले विद्या नसेल त्याला खटाऱ्याचा बैल म्हटलं तरी चालेल.' गाडगेबाबांनी ग्रामीण शिक्षणाचा पाया घातला. घराघरांत ज्ञानाची पाणपोई सुरू केली. ऋणमुक्त, दारिद्र्य–मुक्त, अज्ञानमुक्त आणि व्यसनमुक्त समाजासाठी गाडगेबाबांनी स्वत:चीच अनौपचारिक शाळा सुरू केली. असे हे संत गाडगेबाबा महान शिक्षकच होते.


२ डिसेंबर : 'गेट वे ऑफ इंडिया'ची उभारणी १९११

मानवता हीच देवाची सेवा ।

शिकून सवरून माणूस बना. 'माणसाने माणसाबरोबर माणसासारखे वागावे,' हा महामंत्र समाज सुधारक संत गाडगेबाबांनी समाजाला दिला. 'मानवता हाच खरा धर्म,' जातिभेद मानू नका. पशुपक्ष्यांना अभय द्या. 'दुसऱ्या जीवाचे रक्षण करणे हे सर्वांत मोठे पुण्य.' हे माणुसकीचे तत्त्वज्ञान साध्या, सोप्या भाषेतून पटवून दिले. समाजसेवा करणाऱ्या अनेक संस्थांना त्यांनी उदार हस्ते मदत केली.

*कणकण करूनी कोटी केले ।*
*कण न खर्चला स्वतःसाठी ।*
*वणवण फिरूनी कणकण झिजले बाबा ।*
*दुःखी जनतेसाठी ।*

राष्ट्रसंत गाडगेबाबांनी आपले संपूर्ण जीवन जनता जनार्दनांची मने आणि गावे स्वच्छ करण्यात घालविले. एक मनुष्य आणि त्याचा एक विचार समाजाला बदलण्याची ताकत ठेवतो हे त्यांच्या उदाहरणावरून अनुभवास येते.

संत गाडगेबाबा आपल्या अनुयायांना सांगत, 'कोणा बंगल्यात मला मरण येऊ नये. माझा देह जेथे जाईल ते माझे ठिकाण. मरणानंतर माझी समाधी बांधू नका. माझ्या कोणी प्रेमीजनांना पत्र लिहून बोलावू नका. मरणाच्या वेळी जे जवळ असतील तीच माझी माणसे.' त्यांची इच्छा त्यांच्या अनुयायांनी पूर्ण केली. तो शेवटचा काळदिन ठरला २० डिसेंबर १९५६. या महान विभूतीच्या अनमोल विचारांचा वारसा या भारतभूमीला लाभला आणि या पुण्यात्म्यांनी रचलेल्या पायावर मूल्यांची इमारत उभी होताना दिसते. गाडगेबाबांना हेच तर अपेक्षित होते!

■■■

**(पृष्ठ क्र. ६ वरून)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाच्या प्रश्नाला खूप महत्त्व देत असल्याने अतिशय पोटतिडकीने, जिव्हाळ्याने बहुजनांच्या शिक्षणासंबंधी आपली मते व्यक्त करताना दिसतात.

आईवडील मुलास जन्म देतात, कर्म देत नाहीत असे म्हणणे ठीक नाही. आईवडील मुलांच्या आयुष्याला वळण लावू शकतात, ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपण मुलांच्या शिक्षणाबरोबर मुलींच्याही शिक्षणासाठी धडपड केली, तर आपल्या समाजाची प्रगती झपाट्याने होईल. या खोल विचारातच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मोद्धार चळवळीची बीजे दिसून येतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनाने हे सिद्ध केले की, बहुजन समाजाची उत्कर्षाची शक्ती नष्ट झालेली नाही. त्यांच्या ठायी असलेले धैर्य आणि सद्गुण जिवंत आहेत याचा हा भरभक्कम पुरावा आहे.

आज या स्वतंत्र भारतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचारपूर्वक तयार केलेल्या संविधानामुळेच वंचितांतील वंचित घटक शिक्षण घेत आहे, उच्च शिखर गाठत आहे. आदिवासी पाड्यांमधून आलेले विद्यार्थी देखील भारतातील सर्वोच्च परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रशासकीय सेवेत उच्च पदावर विराजमान होत आहेत हे वास्तव आहे. अशा अनेक बाबी आहेत ज्या विसरून चालणार नाहीत.

मला वाटते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, हे वाचून कळतात. त्यांचा प्रत्येक विचार हा देशहिताचाच आणि मानवतावादी मूल्ये रुजविणारा आहे. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना कोटी कोटी प्रणाम.

शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा!

■■■

# शिक्षणाच्या नव्या वाटा...

**नंदा भोर**

विषय सहायक - रा. शै. सं. व प्र. प. म. पुणे. भ्रमणध्वनी : ८१४९२१७०२१

*शाळाबाह्य मुलांना शिक्षण प्रवाहात आणणे, टिकवून ठेवणे, गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करणे अशी विविध आव्हाने पेलत शिक्षण विभाग आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पराकाष्ठेचे प्रयत्न करीत आहेत. परिषदेचे अनेक उपक्रम सुरू असतात. त्यातूनच साकारलेल्या 'शिक्षणाच्या नव्या वाटा'या पुस्तकाविषयी...*

शिक्षक आपल्या क्षेत्रात, विषयात अधिक यशस्वी व्हावेत, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी कायम प्रेरित असावेत, नवनवीन तंत्रज्ञान, शासकीय ध्येयधोरणांची त्यांना माहिती असावी यासाठी शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण देणे तसेच अभ्यासक्रम निश्चिती प्रक्रिया, शासकीय योजनांचे कार्यान्वयन अशी विविध कार्ये करीत असणारी शासनाची अग्रगण्य संस्था म्हणजे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या संस्थेकडून राज्याच्या शैक्षणिक ध्येयधोरणांना कार्यान्वित करण्याचे काम केले जाते. शिक्षकांना काम करण्यासाठी प्रेरित करणारी ही संस्था शिक्षकांच्या उत्कृष्ट कामासाठी वेळोवेळी त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत असते, त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामाचे सर्व राज्यांसमोर, देशासमोर सादरीकरण करण्याची संधीसुद्धा या संस्थेद्वारे दिली जाते. त्यामुळेच शिक्षकांची मातृसंस्था असा या संस्थेचा उल्लेख केला जातो. शिक्षकांसाठी अनेक उपक्रम राबविणाऱ्या या संस्थेने २०१९-२० या वर्षात एका उत्कृष्ट व राज्यातील इतर शिक्षकांना प्रेरणादायी ठरेल अशा 'शिक्षणाच्या नव्या वाटा' या पुस्तकाचे संपादन केले आहे. राज्यात विविध जिल्ह्यांत अगदी दुर्गम भागात तसेच प्रतिकूल आर्थिक, सामाजिक परिस्थितीत आपले तनमनधन समर्पित करून, जिल्हा परिषद शाळांना उत्कर्षाच्या शिखरावर नेणाऱ्या शिक्षकांची आणि त्यांच्या शाळेची यशोगाथा, इतर शिक्षक, पालक, विद्यार्थी तसेच प्रशासकीय यंत्रणेतील सर्वच घटकांना ज्ञात व्हावी, त्यांना प्रेरणा मिळावी यासाठी पुस्तकरूपात सर्वांसमोर आणलेली आहे. एकंदरीत सव्वीस शाळांची यशोगाथा सांगणाऱ्या 'शिक्षणाच्या नव्या वाटा' हे पुस्तक प्रत्येकानेच वाचावे असे आहे.

'शिक्षणाच्या नव्या वाटा' या पुस्तकाला दिलेले शीर्षकच बरेच काही सांगून जाते. या पुस्तकात समाविष्ट नसलेल्या राज्यांतील अनेक शाळा व त्यांचे शिक्षकही प्रगतीच्या दिशेने प्रयत्न करीत आहेत, त्यांना विकासाची योग्य दिशा या पुस्तकामुळे प्राप्त होईल. माहितीचा फापटपसारा न मांडता अगदी मोजक्या व समर्पक शब्दांत प्रत्येक शाळेच्या प्रगतीचा आलेख मांडलेला आहे. शाळेपुढे काय प्रतिकूल परिस्थिती होती, त्या प्रतिकूल परिस्थितीकडे पाठ न फिरविता सामोरे जाऊन विद्यार्थ्यांचा, त्यांच्याबरोबर त्यांच्या पालकांचा व पर्यायाने गावाचा कसा कायापालट केला, त्याचे चित्रदर्शी वर्णन पुस्तकात केलेले आहे. शाळेचा विकास फक्त शासनाच्याच मदतीने होतो असे नाही,



४ डिसेंबर : रोहिणी आर. एच. ७५ या रॉकेटचे थुंबा येथून प्रक्षेपण

तर त्यासाठी शिक्षकांमध्ये दुर्दम्य इच्छाशक्ती असावी लागते आणि असे असेल तर त्या शाळेच्या प्रगतीला कोणीही मर्यादा घालू शकत नाही. 'झिरो एनर्जी शाळा' वाबळेवाडीने सर्वांसमोर हा आदर्श घालून दिला आहे. पर्यावरणाचा ध्यास असणाऱ्या, स्वयं-अध्ययनाची प्रेरणा देणाऱ्या या शाळेने आंतरराष्ट्रीय दर्जा कसा गाठला, याचे प्रत्ययकारी वर्णन या पुस्तकात केले आहे.

शहरी भागातील शिक्षणाला लाजवील असे उत्तम प्रकारचे शिक्षण आदिवासी भागातील पाड्यांवर मिळू शकते, हे सांगणारे 'तांड्यातून वाहते शिक्षण गंगा, पालकांची उन्नती शाळेची प्रगती...', कोयनागुडाने कात टाकली, आमारगाव मायली शाळा, शैक्षणिक गुणवत्तेचे सुगंधी रानफूल, शैक्षणिक गुणवत्तेचा डोह पालडोह, ३६५ दिवस सुरू असणारे ज्ञानपीठ, चिमुकले मुक्तांगण, इ. लेख महाराष्ट्रातील शिक्षण कात टाकते आहे, तसेच बोलीभाषातून प्रमाणभाषेकडे विद्यार्थी येऊ लागला आहे याची जाणीव वाचकाला निश्चितच करून देतील. एकविसाव्या शतकातील विज्ञानयुगाला आपल्या कवेत घेणाऱ्या शाळा महाराष्ट्रात आहेत, याचा प्रत्यय देणारे 'एकविसाव्या शतकातील टेकगुरू', 'तंत्रज्ञानाची कास-गुणवत्ता विकास', 'शाळेच्या ओजस्वी प्रवासाची गोष्ट', 'ग्राऊंड झिरो रिपोर्ट', 'झिरो एनर्जी' हे लेख पुस्तकात समाविष्ट आहेत.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे स्वप्न उशीरा का होईना परंतु साकार होणार आहे. 'नई तालीमचा समृद्ध अनुभव देणारी शाळा', 'शैक्षणिक गुणवत्तेचे सुगंधी रानफूल' हे लेख विसाव्या शतकातील महात्मा गांधीजींचे मूलोद्योगी शिक्षण नव्याने आकाराला येत आहे याचे निदर्शक आहेत. 'धारावीतील काळा किल्ला आणि तिमिरातुनी तेजाकडे' हे लेख वाचल्यावर त्या शिक्षकांना आणि मुख्याध्यापकांना सॅल्यूट करावा वाटतो. राज्यातीलच नव्हे, तर देशातील प्रत्येक शिक्षकाला याची जाणीव असावी की, या शाळांमध्ये कार्य करणारे शिक्षक आणि इतर शिक्षक यांना कामाचा मोबदला एकच, पण त्यांच्या कार्याच्या गुणवत्तेचे मापदंड हे कोणत्याच मूल्यमापन तंत्राने मोजता न येणारे आहेत. त्यांच्या शैक्षणिक कामाने फक्त त्या शाळेच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ताच वाढली नाही, तर त्या त्या गावाचा आर्थिक, सामाजिक व भौतिक विकास पण घडून आला आहे. या शिक्षकांच्या प्रयत्नांनी स्थलांतर होत असलेली कुटुंबे गावातच स्थिरावली आहेत.

विशेष म्हणजे प्रत्येक लेखाला दिलेले शीर्षक वाचकांचे लक्ष आकर्षित करून घेते. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाबरोबरच त्यांच्या आर्थिक विकासाची पायाभरणीही या शाळांमधून कशी केली जाते याचे सुंदर वर्णन प्रत्येक लेखात केलेले आहे. शाळा सुटल्यानंतर एखादा विद्यार्थी पाणीपुरी विकून आपल्या कुटुंबाला कसा हातभार लावतो हे वाचल्यानंतर लक्षात येते की, येथे विद्यार्थी फक्त गुण प्राप्त करीत नाहीत, तर गुणी सुद्धा होतात. स्पर्धा परीक्षेत चमकणारी विद्यार्थ्यांची संख्या वाचल्यानंतर कवी वसंत बापट यांचे बालगीत ओठावर येऊन जाते,

*छोटेसे बहीण-भाऊ,*
*उद्याला मोठाले होऊ*
*उद्याच्या जगाला, उद्याच्या युगाला*
*नवीन आकार देऊ ।। धृ।।*

या शाळांनी या बालगीतातील आशय प्रत्यक्षात उतरविला आहे आणि तो तुमच्या-आमच्या पर्यंत पोहोचविण्याचे काम राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे, यांनी या पुस्तकाच्या रूपाने

**(पृष्ठ क्र. १४ वर)**

# नवी पहाट

**अर्चना शिरसाट**
जि. प. प्राथ. शाळा, डेरेवाडी, ता. संगमनेर, जि. अहमदनगर.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या वतीने प्रथमच 'कॉफी टेबल बुक' प्रकाशित करण्यात आले आहे. अत्यंत रेखीव आणि चार रंगी असलेले हे पुस्तक हाती पडताच पूर्ण वाचल्याशिवाय खाली ठेवावे असे वाटत नाही. वंचित मुलांच्या आयुष्याचा पट यात सहजतेने उलगडला आहे. राज्यात शिक्षणाची द्वारे खुली झाली असली तरी अजूनही वाड्या-वस्त्यांवर, पाड्यांवर मुले शिक्षणाच्या प्रतीक्षेत असल्याचे दिसून येते. त्यांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी अनेक सहृदय बालरक्षक किती वेगवेगळ्या प्रकारे प्रयत्न करीत आहेत याचा प्रत्यय प्रत्येक लेखातून येतो. या बालरक्षकांचे काम किती वेगळ्या वाटेचे आहे आणि वरवर सोपे वाटत असले, तरी ते किती कठीण वळणाचे आहे हे वाचताना सतत जाणवत राहते.

खरे तर वंचितांच्या शिक्षणाची काळजी वाहण्याचे काम राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद स्तरावर विविध माध्यमांतून सुरू असते. मात्र राज्यात वंचितांच्या शिक्षणासाठी सुरू झालेल्या 'बालरक्षक चळवळीची यशोगाथा' आणि त्यासाठी राज्यात झालेल्या प्रयत्नांची छायाचित्रांसह नेमक्या, मोजक्या अत्यंत साध्या, सोप्या शब्दांत मांडणी असलेले हे पुस्तक वाचकांना अंतर्मुख करते. पुस्तक अत्यंत वाचनीय झाले आहे. पुस्तकातील अनेक प्रसंग वाचताना डोळ्यांत पाणी तरळते आणि त्याच वेळी राज्याच्या कानाकोपऱ्यांत शिक्षक किती तळमळीने काम करीत आहेत हेही सहजपणे लक्षात येते.

> “ *स्थलांतरित, शाळाबाह्य, वंचितांच्या शिक्षणासाठी सुरू झालेली बालरक्षक चळवळ चांगलीच विस्तारली आहे. अज्ञान, दारिद्र्य यांच्या अंधकारात चाचपडणाऱ्या बालकांचे आयुष्य, या चळवळीच्या सोनेरी पहाट किरणांनी उजळू लागले आहे. वंचित मुलांच्या आयुष्याचा पट उलगडणारे परिषदेचे पहिलेच कॉफी टेबल बुक अर्थात 'नवी पहाट' या पुस्तकाविषयी...* ”

पुस्तकाचा आरंभ विविध मान्यवरांच्या शुभ संदेशाने होतो. पुढे मात्र बालरक्षकांची चळवळ कशी सुरू झाली येथून पुस्तकाचा प्रवास सुरू होतो. श्री. राख सरांच्या प्रयत्नांत दिसणारी तळमळ अधोरेखित होते. नेपाळच्या विद्यार्थ्यांना दाखल करताना केलेले प्रयत्न आणि भाषेचा झुगारून दिलेला अडथळा, हे सर्व वाचताना केवळ विद्यार्थ्यांप्रति प्रेम आणि जिव्हाळा असला, की सर्व अडथळ्यांवर सहजतेने मात करता येते हे लक्षात येते. सावित्रीच्या लेकी शाळेत आल्याचे समाधान घेऊन प्रवास सुरू ठेवताना अनेक ठिकाणी ही मुले शाळेत येत आहेत म्हटल्यावर समाजातील विविध संस्था आणि दातृत्वाचे हात आपोआप पुढे येतात. मुळात हेतू चांगला ठेवून चालत राहिले की, अंधाराची भीती अशी उरतच नाही हे अनेक लेखांमधून सतत जाणवते. बालरक्षक किती मेहनतीने काम करीत आहेत हे पानोपानी वाचायला मिळते. पालकांचे व्यसन सोडणे असेल, पालकांच्या हाताला काम देणे असेल, विद्यार्थ्यांच्या आरोग्याची

काळजी घेणे असेल, मुलांसाठी बागा फुलविणे असेल किंवा स्थलांतरित पालकांच्या पाल्यांना स्वतःच्या जबाबदारीवर निभावणे असेल त्यासाठी हे बालरक्षक पदरमोड करीत झटत असतात. मुलांच्या शोधासाठी, शिक्षणासाठी बालरक्षकांनी केलेले विविध प्रयत्न म्हणजे कसरतच आहे. या संपूर्ण पुस्तकात बालरक्षकांची तळमळ, त्यांची संवेदनशीलता, विद्यार्थ्यांविषयी प्रेम, कर्तव्याची जाणीव यांचे दर्शन घडते. समाजात असे हात उभे राहिले तर कोठेही विद्यार्थी शाळाबाह्य राहण्याची शक्यता नाही हे सतत जाणवत राहते. या मुलांना शाळेत रमविण्यासाठीचे प्रयत्न, शाळेत दाखल करताना आलेल्या अडचणींवर मात करताना केलेले प्रयत्न, कधी प्रसंगी करावे लागलेले दोन हात हे सर्व वाचताना काळजात कालवाकालव होते.

शिक्षकी पेशाबाहेरची माणसे ज्या पद्धतीने मुलांच्या शिक्षणाची काळजी वाहतात आणि त्यासाठी जिवापाड प्रयत्न करतात ते पाहिले की, माणूसपणाची ज्योत तेवती असल्याचे प्रत्ययास येते. वर्तमानात देखील अशी चांगली माणसे आपल्या अवतीभोवती आहेत हे सहज लक्षात येते. शिक्षणाच्या प्रवाहात ही माणसे काम करीत आहेत म्हणून हा प्रवाह गतिमान होत आहे हेही जाणवते.

या पुस्तकात एकूण ४७ बालरक्षकांचे प्रयत्न अधोरेखित झाले आहेत. मात्र हे सर्व प्रयत्न प्रातिनिधिक स्वरूपातील आहेत. 'कॉफी टेबल बुक'ला दिलेले 'नवी पहाट' हे शीर्षक किती सार्थ आहे याचे दर्शन पुस्तकाच्या पहिल्या पानापासून ते शेवटच्या पानापर्यंत घडत राहते. पुस्तकाची भाषा सोपी आहे. प्रसंग शब्दबद्ध करताना शब्दप्रपंच मर्यादित करावा लागला आहे हे 'नवी पहाट' वाचताना जाणवते, पण आहे त्या मर्यादेत देखील पुस्तक अत्यंत वाचनीय आणि देखणे झाले आहे हे मात्र निश्चित. प्रत्येकाने वाचावे, असे यासाठी सांगावेसे वाटते की, आपल्या भौतिक सुखाच्या लालसेत माणूसपणाच्या गोठलेल्या संवेदना या निमित्ताने पुन्हा जागृत होतात. या बालरक्षकांनी केलेले प्रयत्न म्हणजे प्रेरणेचा प्रचंड ऊर्जा स्रोत असल्याचे दर्शन घडते म्हणूनच आपल्या माणूसपणाच्या जागृतीसाठी, ऊर्जा भरून घेऊन कार्यरत होण्यासाठी प्रत्येकाने हे पुस्तक वाचायला हवेच.

■■■

---

**(पृष्ठ क्र. १२ वरून)**

केले आहे.

मुखपृष्ठ आकर्षक, लक्ष वेधून घेणारे आहे, तसेच पुस्तक निर्मितीत साहाय्य करणाऱ्या सर्व व्यक्तींचा उल्लेख मुखपृष्ठ क्र. २ वर केलेला आहे. 'संपादकीय' मधून पुस्तकाच्या निर्मितीची आणि आशयाची केलेली कारणमीमांसा पुस्तकाचे अंतरंग सांगून जाते. लेखांची साधीसोपी भाषा आणि चित्रदर्शी वर्णन तसेच आवश्यक त्या ठिकाणी असलेले फोटो, त्या त्या लेखाचे सार सांगून जातात.

असे सुंदर पुस्तक शिक्षक, पालक, विद्यार्थी, प्रशासनातील प्रत्येक घटक या सर्वांनी वाचावे, तसेच ते आपल्या संग्रही ठेवावे कारण भारताचे भविष्य या पुस्तकात दडलेले आहे.

अशा सुंदर निर्मितीसाठी, निर्मिती प्रक्रियेतील सर्वांना खूप खूप धन्यवाद !

■■■

# शाळा उघडताना शिक्षकांसमोरील आव्हाने

**हेरंब कुलकर्णी**
भ्रमणध्वनी : ८२०८५८९१९५

*एकाच वर्गात असणाऱ्या आणि कमी-जास्त आकलन क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना आपण नेहमीच शिकवीत असतो. अध्यापन करताना, त्यांना सर्वांना कसे बरोबर न्यायचे हे कौशल्य आपण आत्मसात केलेले असते, पण कोविडच्या संकटात शिक्षण प्रक्रियाच बदलली. ऑनलाईन, ऑफलाईन, स्वयंअध्ययन, गुगलवरून माहिती घेणारे, अशा अनेक प्रकारांनी शिकलेले विद्यार्थी पुन्हा शाळेत येतील आणि एकत्र शिकू लागतील तेव्हा शिक्षकांपुढे असणाऱ्या आव्हानांचा वेध घेणारा हा लेख.*

कोरोनाचा प्रभाव कमी झाल्यावर शाळा उघडल्या जातील. काही महिन्यांनी कदाचित सारे काही सुरळीत होईल परंतु शिक्षण विभाग आणि शिक्षकांसमोर अनेक समस्या उभ्या असतील. त्याबाबत आतापासूनच विचार व्हायला हवा. चर्चा करायला हवी. सर्वांत मोठी समस्या पटसंख्येची आणि शिक्षणाच्या गतीची असणार आहे.

महाराष्ट्रात परभाषक मजूर हे फक्त केवळ मोठ्या महानगरांपुरतेच राहिलेले नाहीत, तर ते अगदी तालुका स्तरापर्यंत आलेले आहेत. त्यामुळे अगदी तालुका स्तरावर सुद्धा शाळांमध्ये परभाषक मजुरांची मुले आहेत. मोठ्या संख्येने मजूर कोरोनाच्या काळात त्यांच्या राज्यात निघून गेले. काही परत आले परंतु काही अजून गावाकडेच आहेत. त्यांची मुले शाळेत नसल्याने पटसंख्येवर परिणाम दिसेल. त्याचप्रमाणे मोठ्या शहरांतून अनेकांचा रोजगार गेल्याने ते महाराष्ट्रातील त्यांच्या छोट्या गावाकडे गेले आहेत. त्याचाही परिणाम महापालिका, नगरपालिका शाळेतील पटसंख्येवर दिसेल. यापेक्षाही सर्वांत गंभीर प्रश्न शाळाबाह्य मुलांचा निर्माण होणार आहे. आदिवासी आश्रमशाळा, भटक्या-विमुक्तांच्या आश्रमशाळा या पूर्ण बंद आहेत. त्या निवासी असल्याने लवकर सुरू होऊ शकत नाहीत व रेंज नसल्याने त्यांचे ऑनलाईन शिक्षण शक्य नाही. काही शिक्षकांनी ऑफलाईन शिकविण्याचा प्रयत्न केला.

अशा परिस्थितीत ही मुले आज कामाला जात आहेत. पालकांना मदत करीत आहेत व त्यांचा मोठ्या प्रमाणावर शिक्षणाशी संपर्क तुटला आहे. अगोदरच आदिवासी भटक्या विमुक्तांच्या मुलांना शिक्षण विभागाने अतिशय प्रयत्न करून मोठ्या संख्येने शिक्षणाच्या प्रवाहात आणले आणि टिकविलेही. दारिद्र्यावर मात करून मुले शिकू लागली परंतु आता पुन्हा गळतीचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

आदिवासी भटक्या-विमुक्तांच्या विद्यार्थ्यांना पुन्हा आश्रमशाळेत आणणे मोठे आव्हान असणार आहे. त्याचप्रमाणे बालमजुरीचे प्रमाणही वाढले आहे. याचे कारण म्हणजे अनेक पालकांचे रोजगार गेले आहेत. कुटुंबाला आर्थिक मदत करा, असे अनेक पालक मुलांना सांगत आहेत व ही मुले वेगवेगळ्या ठिकाणी मजुरी करीत आहेत. शाळा बंद असल्याने ही बालमजुरी तात्पुरती आहे असे अनेकांना वाटेल परंतु हातात पैसा येऊ लागला की शाळेची ओढ वाटणार नाही आणि पालकांनाही पैसे

मिळू लागल्यामुळे ते मुलांना शाळेत पाठविणार नाहीत, हा बालमजुरीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर नक्कीच झालेला दिसणार आहे. इयत्ता नववी नंतरच्या मुलांबाबत हा धोका जास्त संभवतो, याचे आणखी एक कारण म्हणजे इयत्ता नववी नंतर पाठ्यपुस्तके विकत घेणे, शिकवणी लावणे आणि उच्च शिक्षणात करावा लागणारा महाविद्यालयीन पातळीवरचा खर्च यामध्ये अनेक गरीब पालक मुलांना शिकवायला इच्छुक नसणार असेही होऊ शकते. त्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण वाढत होते ते आता पुन्हा कमी होण्याची शक्यता आहे.

बालविवाहांची संख्या कोरोनाच्या काळात खूप वाढली. प्रशासनाचे कोरोना निर्मूलनात लक्ष होते व कमी लोकांच्या उपस्थितीत लग्ने होत होती. त्यामुळे लग्नाची फार चर्चा होत नव्हती. याचा गैरफायदा घेऊन अनेक पालकांनी आपल्या मुलींचे बालविवाह केले आहेत. रोजगार जाणे व आर्थिक विवंचना यांमुळे पालकांनी असा निर्णय घेतला, असे असले तरी त्या मुलींच्या शिक्षणाच्या संधी कायमच्या हिरावल्या गेल्या आहेत. बालविवाह होणाऱ्या मुलींचे वय वर्ष हे नेहमीच १२ ते १६ दरम्यान असते म्हणजे इयत्ता सातवी ते बारावी पर्यंत शिकणाऱ्या या मुली असतात. या मुलींचे शिक्षण बंद झाले आहे. यातून मुलींच्या गळतीचे प्रमाण वाढणार आहे. त्याचप्रमाणे या मुलींच्या आरोग्याचाही गंभीर प्रश्न निर्माण होईल. अनेकदा असे दिसून आले आहे की, ज्या मुलींचा बालविवाह होतो त्या मुलींच्या शरीरात रक्त कमी असते, त्या ॲनिमिक होतात. बाळंतपणात माता मृत्यूची शक्यता अधिक वाढते. त्यांच्या मुलांचाही मृत्यू होऊ शकतो किंवा ती कुपोषित राहतात. या मुली कायम अशक्त राहतात व मानसिक दृष्ट्या दुर्बल होतात.

अशा परिस्थितीत या बालविवाहांचा शिक्षण आणि आरोग्य यांवर गंभीर परिणाम होतो. त्यामुळे झालेल्या बालविवाहांची नोंद गावातील प्रमुख अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देणे व शक्य तितक्या मुलींना पुन्हा शाळेत आणण्याचे आव्हान शिक्षण विभाग, शाळा व शिक्षकांना पेलावे लागणार आहे. गावपातळीवर असे करताना अनेक अडचणी असतात हे मान्य आहे परंतु आपण प्रकाशात न येता काही प्रमुख नागरिकांच्या मार्फत असे करणे नक्कीच शक्य आहे. त्याच वेळी किमान येथून पुढे तरी असे बालविवाह होणार नाहीत, याबाबत सतर्क राहायला हवे. दिवाळीनंतर लग्न कार्यास सुरुवात होते व गरीब कुटुंबातील मुलींच्या बाबतीत कोरोनाने आर्थिक ताण वाढत असल्याने अजूनही असे घडू शकते. त्यामुळे सतर्क राहायला हवे.

त्याचप्रमाणे वर्गातही अनेक समस्या निर्माण होणार आहेत. ऑनलाईन शिकलेली मुले व ऑफलाईन शिकलेली मुले एकाच वर्गात बसणार आहेत. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण झाले आहे असे विद्यार्थी आणि ज्या विद्यार्थ्यांकडे मोबाईल नव्हते असे विद्यार्थी यांना एकाच वेळी कसे शिकवावे ही समस्या शिक्षकांपुढे असेल. त्यात जवळपास सहा महिने वाचन, लेखन कौशल्ये थेट वापरात नसल्याने विद्यार्थ्यांचे भाषण, लेखन यांवर गंभीर परिणाम दिसणार आहेत. विशेषतः इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत हे अधिक तीव्रतेने जाणवेल. त्यामुळे जोडाक्षरांचा सराव, गणिती क्रियांचा सराव हे पहिले काही महिने तरी करून घ्यावे लागणार आहे. त्याच वेळी ऑफलाईन शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होऊ नये याचीही काळजी घ्यावी लागेल कारण मोबाईलच्या माध्यमातून ऑनलाईन शिकलेले विद्यार्थी शिक्षण प्रक्रियेत अखंड होते, त्यामुळे ते वर्गातही सक्रिय दिसतील. याचा परिणाम या मुलांच्या मानसिकतेवर होऊ शकतो. यामुळे शिक्षकांना आपण पुन्हा पहिल्यापासून

**(पृष्ठ क्र. २० वर)**

# शिक्षण : कोविड काळातले आणि नंतरचे

**गीता महाशब्दे**
भ्रमणध्वनी : ९८२२६१४६८२

*कोविडमुळे आपण ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय निवडला, कारण इलाजच नव्हता. मात्र कोविड नंतरच्या काळातही ऑनलाईन शिक्षणाचा आग्रह धरून चालणार नाही कारण शिक्षण ही मुलांचे जगणे माहीत असलेल्या शिक्षकांशी आणि मित्र-मैत्रिणींशी समक्ष होणाऱ्या देवाण-घेवाणीतून घडणारी एक सामूहिक सांस्कृतिक प्रक्रिया आहे. तिला पर्याय असू शकत नाही. कोविड नंतरच्या काळात औपचारिक अभ्यासक्रम शिकण्याच्या प्रक्रियेला उभे करणे हे आज व्यवस्थेचे काम आहे. ते कसे करता येईल, ते करणे आवश्यक का आहे याविषयी...*

कोविड काळात शिक्षण क्षेत्रात अवघड परिस्थिती निर्माण झाली. जूनमध्ये शाळा सुरू होण्याची वेळ आली तरीही महामारी आटोक्यात आलेली नव्हती. एकीकडे कोविडची भीती आणि दुसरीकडे जी मुले एकंदरीतच शिक्षणाच्या परिघावर असतात ती शाळाबाह्य होण्याची धास्ती. काही काळापुरता तरी दूरशिक्षणचाच पर्याय निवडावा लागणार हे त्यावेळी स्पष्ट झाले परंतु 'दूरशिक्षण' म्हणजे ऑनलाईन शिक्षण' असे एक समीकरणच सर्व पातळ्यांवर जोमाने पुढे आले. ऑनलाईन शिक्षण हा कोणत्याही अर्थाने समक्ष शिक्षणाला पर्याय होऊ शकत नाही. महाराष्ट्रात ७० टक्क्यांहून जास्त मुले उपलब्धतेच्या कारणांनी त्यापासून वंचित आहेत. (संदर्भ - ॲक्टिव्ह टीचर्स फोरमने केलेला सर्व्हे). ज्या मुलांना स्मार्टफोन किंवा लॅपटॉप मिळतो, ती मुलेही ऑनलाईन शिक्षणाबाबत समाधानी नाहीत आणि ते रास्तही आहे. स्क्रीनवरचे द्विमित जग हे प्रत्यक्षातल्या त्रिमित जगाला कधीच पर्याय ठरू शकत नाही. मुळात शिक्षण ही एक जैव प्रक्रिया आहे. मुलांचे जगणे माहीत असलेल्या शिक्षकांशी आणि मित्र-मैत्रिणींशी समक्ष होणाऱ्या देवाण-घेवाणीतून घडणारी ती एक सामूहिक सांस्कृतिक प्रक्रिया आहे. तिला ऑनलाईन जगात कोणताच पर्याय नाही. जिथे देवाणघेवाण नाही, तिथे मन गुंतत नाही आणि मन नाही तिथे शिक्षण नाही. उच्च दर्जाचे तंत्रज्ञान शाळांना, मुलांना उपलब्ध व्हायला हवेच परंतु ते केव्हा, कोठे, किती आणि कशासाठी वापरायचे याचा निर्णय सर्वस्वी शिक्षकांचा असला पाहिजे; तंत्रज्ञान विकणाऱ्या कंपन्यांचा किंवा शासनाचा नाही. सरकारची 'डिजिटल भारत' भूमिका, त्यात कॉर्पोरेट कंपन्यांनी केलेली गुंतवणूक, नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने ऑनलाईन शिक्षणाला दिलेले अतिरिक्त महत्त्व, यावरून असे दिसते की, ऑनलाईन शिक्षण ही सरकारची प्राथमिकता आहे. कोविड काळातील शिक्षणाचे प्रयत्न त्याच दिशेने झाल्याने शिक्षणातली विषमता अधिकच वाढून मुलांच्या थेट अनुभवास आली परंतु कॉर्पोरेट आणि बाजारू जगाची प्राथमिकता ही शिक्षणाची आणि मुलांची प्राथमिकता होऊ शकत नाही. कोविड आणि त्यानंतरच्या परिस्थितीतही ऑनलाईन शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न होऊ शकतो परंतु ते घडू देता कामा नये. मग काय घडले पाहिजे? राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ मधील अनेक मुद्दे आजच्या परिस्थितीत लागू


९ डिसेंबर: छत्रपती शिवाजी महाराजांच्या सूनबाई महाराणी ताराबाई स्मृतिदिन १७६१

आहेत. उदा. नई तालीमच्या विचारधारेचा धागा घेऊन पुढे गेलेला Work in Education हा पोझिशन पेपर. मुले या काळात काय करीत आहेत, काय शिकत आहेत, हे पाहिले तर याचे महत्त्व अधोरेखित होते.

## मुले सध्या काय करीत आहेत?

- पुण्यातली वेदिका यू-ट्यूब वरून कोडिंग, कॅलिग्राफी, स्केचिंग शिकली. डान्स शिकतच होती आधीपासून. पेपर क्राफ्टचे स्वतःचे यू-ट्यूब चॅनेल चालू केले. शाळेचे ऑनलाईन तास चालू आहेत. 'पुढच्या वर्गात जाण्याइतका अभ्यास पूर्ण झालाय का?' या प्रश्नावर तिने विचारले,

  'म्हणजे सिलॅबस का? सिलॅबस झाला आहे, पण सगळे समजलेले नाही.
- हिंगोलीची आर्या वाईकर म्हणते, 'आमच्या गल्लीत काही दुसऱ्या राज्यातले मजूर होते. त्यांना धान्य वगैरे देऊन आम्ही मदत केली. बाबांकडून विज्ञानाचे प्रयोग शिकले. 'जनगणित' ची सेशन्स करते. आकाश निरीक्षण केले. मावशीकडून केक शिकले. आईला स्वयंपाकात मदत करायला शिकले.'
- कॉ. बी. टी. आर. हायस्कूल, मोड (ता. तळोदा, जि. नंदुरबार) येथील कुंदीलाल माळी हे शिक्षक त्यांच्या विद्यार्थ्यांबद्दल सांगतात, 'ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना माहिती मिळविण्यासाठी धडपड करावी लागत असली, तरी नवनवीन बाबी शिकत मुलांनी आपली शिकण्याची ओढ जागृत ठेवली आहे. मुले, मुली घरातील व शेत शिवारातील जड-हलकी सर्व प्रकारची कामे करू लागतात. तीच कामे करताना त्यांतील कौशल्ये मुलांनी शिकून घेतली आहेत. त्याच वेळी उपलब्ध करून दिलेल्या साधन स्त्रोतांद्वारे आपले शालेय शिक्षण सुरू ठेवण्यात काही प्रमाणात यशस्वी झाली आहेत. मात्र शाळेपासून दुरावलेली मुले-मुली शाळा सुरू होण्याची वाट पाहत आहेत. शाळेव्यतिरिक्त इतर माध्यमांतून माहिती मिळविणे मुले शिकली आहेत. ऑनलाईन माहिती व शिक्षण घेणे सुरू झाल्याने त्यातील तंत्र मुलांनी आत्मसात केले आहे. 'माहिती पाहिजे, तर गुगल वर सर्च करा' असे संभाषण कानी येते. माहितीचे महत्त्वाचे स्त्रोत; जसे घरातील शिकलेली व्यक्ती, घराच्या आजूबाजूच्या व्यक्ती, आजी, आजोबा, ज्यांच्याकडे आधी दुर्लक्ष केले जायचे; त्यांच्याकडून शिकणे, माहिती घेणे चालू आहे.
- तेजस्विनी आणि दिव्या या दोन मुलींनी घरात वापरात येणारी पायपुसणी बनविणे शिकून घेतले आहे. कदाचित परिस्थितीने त्यांना शिकायला प्रोत्साहनच दिले असणार. मुले-मुली करीत असलेल्या कामांची यादी मोठी आहे. शेतात कामाला जाणे, ठिबक सिंचन नळ्या अंथरणे, दुकानात थांबून व्यवहार पाहणे, पायपुसणी तयार करणे, ऑनलाईन माहिती मिळविता येणे, प्रौढ व मोठ्या व्यक्तींकडून माहिती गोळा करता येणे, किराणा माल स्वतः आणणे, घरातील कामे करणे व घराचा सांभाळ करणे, कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी हातभार लावणे इ. सर्व कामांमध्ये पाठ्यपुस्तकात असलेले शिक्षण नसेल, मात्र जीवन कौशल्ये आत्मसात करण्याचे शिक्षण मुले मुली करीत आहेत.
- कल्याणी तायडे ही जानेफळ, जालना येथील सविता बरंडवाल या शिक्षिकेची विद्यार्थिनी स्वयंपाक, विहिरीचे पाणी काढणे, देवपूजा करणे, रांगोळी काढणे, इतर घरकाम, लेकरे सांभाळणे यांबरोबरच बॅडमिंटन खेळणे, सायकल चालविणे हे करीत आहे. गायत्री तायडे ही विद्यार्थिनी अवघड डिझाईन असलेली वायरची मोठमोठी तोरणे करायला शिकली आहे. गणेश सरोदे गोष्टी वाचतो, सविता

मॅडम चाचणी पेपर देतात ती सोडवितो, त्याने रोमन संख्या पाठ केल्या आहेत. तो बैलांना चरायलाही नेतो. पवन पंडित टाकाऊ वस्तूंपासून नवनवीन आयडिया वापरून नवीन वस्तू बनवीत आहे. त्याने मासेमारीसाठी बाण बनविला आहे, उंदीर पकडण्यासाठी पिंजरा बनविला आहे आणि आता तो पोतड्यांपासून आरामदायक खुर्ची बनवतोय.

- मंगेश सरोदे म्हणतो, 'वखर हाणणे, बैलगाडी चालविणे, झाडे लावणे, भौमितिक रचना, मोटर कशी सुरू करायची, मोटरचा फीस कसा टाकायचा, डीपी वर फीस कसा टाकायचा, फिल्टरवर पाणी किती लावायचे, फिल्टरची चाळणी कशी धुवायची, ठिबकचे ड्रिप कसे चालू करायचे, काडी कशी बसवायची अशा कितीतरी गोष्टी मी शाळा बंद झाल्यापासून बऱ्यापैकी शिकलो.'
- पुण्यातली अस्मी म्हणते, 'सायकलवरून भाजी आणायला शिकले, इंग्लिश कविता करायला शिकले, मराठी छान वाचायला शिकले, नव्या प्रकारची उदाहरणे शिकले, ऑम्लेट, चहा, कॉफी करायला शिकले. स्वत:च स्वतःचा वेळ घालवायला शिकले.'

एकूणच असे दिसून येत आहे की, मुले हलकी-जड कष्टाची कामे शिकत आहेत. कुटुंबात असलेली कारागिरी शिकत आहेत. अवघड नैसर्गिक, आर्थिक, सामाजिक स्थितीत तगायचे कसे याचे जीवन शिक्षण मुले घेत आहेत. स्व-अभ्यास करायला शिकणे हे कोविड काळात मुलांना शिकता येण्यासारखे आणि दीर्घकाल उपयोगी पडणारे कौशल्य आहे. त्या दृष्टीने आम्ही करीत असलेल्या जनगणित या मोफत ऑनलाईन कार्यशाळांच्या प्रयोगात काही इंटरेस्टिंग गोष्टी घडत आहेत. शेतातल्या घरात एका स्मार्ट फोनवर या कार्यशाळेत सहभागी होणारी ५-६ मुले, त्यांना झूम वापरायला जमावे यासाठी धडपड करणारी त्यांची शिक्षिका, शिक्षकांच्या घरी जमणारी जवळपासची मुले, दहाच्या कार्यशाळेसाठी साडेनऊ पासून झूम मीटिंगच्या दारात येऊन बसणारी उत्साही मुले, कृती करून संकल्पना समजली की, चमकणारे या शे-दीडशे मुलांचे डोळे, या कार्यशाळांचे व्हिडिओ वापरून गूगल मीट वर आपल्या वर्गाला शिकविणारे व त्यासाठी माझे प्रेझेंटेशन मागून घेणारे शिक्षक, हे सगळे कोविडच्या काळातले प्रकाशाचे तुकडे आहेत. तरीही ते पुरेसे नाहीत. कोविडची परिस्थिती अभूतपूर्व आहे. शहरातील सोसायट्यांमध्ये, वस्त्यांमध्ये आणि गावात मुले एकत्र खेळत आहेत. श्रमांची कामे, कारागिरी, जीवन शिक्षण शिकून आलेल्या या मुलांशी शाळा उघडल्यावर आपण 'मधल्या काळात काही घडलेच नाही' असे वागू लागलो, तर मात्र ही मुले शिक्षणात टिकणे अवघड आहे. नई तालीम पद्धतीने श्रम आणि शिक्षण याची सांगड घालून शिक्षणाची पुनर्रचना करण्याची गरज आणि एक मोठी संधी आपल्यासमोर आहे; नाही तर आज श्रमांचा रस्ता धरलेली लाखो मुले-मुली शाळाबाह्य होण्याची, मुलींचे बालविवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही शिक्षक व कार्यकर्ते आज मुलांच्या घरांपर्यंत अभ्यास पोहोचवून त्यांचा शिक्षणातला रस टिकविण्यासाठी झटत आहेत. बालभारतीची पाठ्यपुस्तके या परिस्थितीतही मुलांच्या हातात पोहोचली आहेत हे महत्त्वाचे आहे. परंतु ती पाठ्यपुस्तके स्व-अभ्यासाच्या दृष्टीने तयार केलेली नाहीत. बालभारतीचा वापर स्व-अभ्याससाठी कसा करायचा याचे मार्गदर्शन मुलांना दूरदर्शनवरून देणे, स्वतः कृती करण्यासाठीचे व्हिडिओ व वर्कशीटस् विविध माध्यमांमधून मुलांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. मुले आता शिकत असलेल्या गोष्टींशी ते करीत असलेल्या श्रमांशी सांगड घालत, औपचारिक अभ्यासक्रम शिकण्याच्या प्रक्रियेला उभे करणे हे आज व्यवस्थेचे काम आहे. प्रत्येक बालकासाठी, प्रत्येक विषयात, ते समजेच्या ज्या पातळीवर आहे, तिथून याची सुरुवात झाली पाहिजे. इयत्तेच्या भिंती लवचीक

करण्याचीही एक मोठी संधी आता शिक्षण व्यवस्थेच्या हातात आहे.

यासाठी काय करता येईल? प्रत्येक विषय श्रमशिक्षणाशी जोडून पहिली ते आठवीचा एकत्र एक रोडमॅप करता येईल. हा कामांचा, संकल्पनांचा, कृतींचा, अनुभवांचा, स्वाध्यायांचा, रचनाबद्ध क्रम असेल. त्या विषयाची खरीखुरी समज व व्यवहारातले ज्ञान तपासणारे मूल्यमापन मुलांना देता येईल. त्यानुसार जेथे मूल असेल तेथून पुढे जाण्याची संधी मुलाला देता येईल. विषयांचे हे रचनाक्रम, त्यासाठी करावी लागणारी पाठ्यपुस्तकांमधील पाठांची रचना, इतर पूरक वाचन साहित्य, शैक्षणिक साधने, मूल्यमापन पद्धती तयार करणे, असे शिक्षण हाताळण्याचा आत्मविश्वास देणारी प्रशिक्षणे शिक्षकांना देणे, हे काम या काळात SCERT व इतर शैक्षणिक संस्थांना करता येईल. हे खूप मोठे काम वाटत असले तरी आजही आपले बरेच शिक्षक हे काम करीत आहेतच. वेगवेगळ्या पातळ्यांवर वेगवेगळे विषय शिकणाऱ्या मुलांना ते तेथून पुढे घेऊन जातच आहेत. ते करीत असलेल्या या कामाला व्यवस्थेचा भाग म्हणून सामावून घेण्यात त्यांची खूप मोठी मदत होऊ शकेल. इतक्या मोठ्या टीमने हे काम केले तर ते अवघड नाही. SCERT ने यात नेतृत्व केले, ज्यांना या कामाचा अनुभव आहे त्यांचे इनपुट घेतले, महाराष्ट्रातील सर्व स्टेक होल्डर्सनी एकत्र येऊन याची अंमलबावणी केली तर कोविडने आपल्याला काहीतरी शिकविले असे म्हणता येईल.

नव्या शैक्षणिक धोरणाच्या चौकटीत हे करणे शक्य आहे का असा एक प्रश्न आहे. शिक्षण हा समवर्ती सूचीमधील विषय आहे. त्यानुसार राज्य शासनांचे घटनादत्त अधिकारही आहेत. आपल्या राज्यातील सर्व मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यासाठी, आवश्यक ते निर्णय घेऊन त्यांची समर्थ अंमलबजावणी करण्याचा रस्ता धरणे राज्यशासनाला शक्य आहे.

■■■

**(पृष्ठ क्र. १६ वरून)**

शिकतो आहोत असा आत्मविश्वास या मुलांना सतत द्यावा लागेल. अन्यथा पुन्हा त्या विद्यार्थ्यांच्या गळतीची समस्या निर्माण होईल.

पालकांशी संपर्क ठेवून त्यांनी मुलांना शाळेत पाठवावे यासाठीही विशेष प्रयत्न शिक्षकांना करावे लागणार आहेत. विद्यार्थी आणि पालक भीतीच्या सावटाखाली असतील व शाळेत यायला तयार नसतील. आम्ही मुलांना घरी शिकवू, पण शाळेत पाठविणार नाही अशी दुराग्रही भूमिका अनेक पालक घेत आहेत. अशा पालकांचे प्रबोधन करावे लागेल. शाळा सुरू झाल्यावर अफवा पसरण्याचे प्रमाण मोठे असेल. एखाद्या शाळेत एखादा मुलगा खोकला किंवा त्याला ताप आला तरी पटकन अफवा पसरतील. व्हॉट्सअप त्यासाठी समर्थ आहे. त्यातून पुन्हा पुन्हा पालकांची समजूत घालावी लागेल. यासाठी शिक्षक–पालक संबंध जितके मजबूत असतील त्या प्रमाणात विद्यार्थी शाळेत टिकून राहतील. अशा वेगवेगळ्या आव्हानांना तोंड द्यावे लागेल.

शालेय पोषण आहार आणखी काही महिने बंद राहील. मुलांचे शालेय पोषण आहार खाण्याचे प्रमाण तुलनेत कमी आहे, पण धान्य व डाळी नेण्याचे प्रमाण जवळपास शंभर टक्के आहे. हीच पद्धत कायम ठेवायला हवी. यातून शिक्षकांचीही शालेय पोषण आहारातून सुटका होईल, वेळ वाचेल व पालकांना थेट तांदूळ व डाळी दिल्या तर ते विद्यार्थ्यांचे पोषण करू शकतील. त्याचबरोबर पोषण आहार शिजविण्यासाठी पालकांना अनुदान द्यावे असाही बदल करण्याचा सरकारने विचार करायला हवा.

■■■

# दैनंदिनी लिहायचीच नाही...

**राजीव तांबे**
भ्रमणध्वनी : ९३२२३९९८५९

*दैनंदिनी, रोजनिशी म्हणजे काय, हे सगळ्यांनाच माहीत असते, पण दैनंदिनी लिहिणारे मात्र फार कमी असतात. रोजच्या रोज आज काय केले, कुठे गेलो हे लिहिणे रटाळ वाटते. त्यामुळेच दैनंदिनी लिहिणे फारसे आवडत नाही. दैनंदिनीकडे बघण्याची वेगळी दृष्टी देणारा हा लेख. दैनंदिनीतून स्वत:ला कसे व्यक्त करायचे, जेणेकरून दैनंदिनी हा आपल्यात होणाऱ्या बदलांचा वेध घेण्याचा प्रयत्न असेल. त्याविषयी...*

'दैनंदिनी लिहायचीच नाही..' असे वाचल्यावर तुम्हां प्रत्येकाच्या मनात वेगवेगळे विचार आले असतील, पण एक विचार नक्की आला असेल की, 'का लिहायचीच नाही.. मग करायचे काय?' तेच तर आता आपण समजून घेऊ या.

'लिहायचीच नाही' याचा साधा, सोपा अर्थ आतापर्यंत जशी लिहीत होतात तशी लिहायची नाही; म्हणजे आज काय झाले? आज काय शकविले? आज कोण भेटले? हे लिहिणे बंद.

दैनंदिनीतील आजच्या पानावर, आजच्या दिवसाबाबत आपल्याला जे काही सांगायचे आहे ते लिहूनच सांगितले पाहिजे असे नाही. त्यासाठी आपण चित्रांचा, कात्रणांचा, व्यंगचित्रांचा जसा उपयोग करू शकतो तसेच वाचलेल्या अग्रलेखांचा, बातमीचा, लेखांचा, पुस्तकांचा संदर्भही देऊ शकतो. पत्र लेखन, संवाद लेखन, बातमी लेखन, आत्मचरित्रात्मक लेखन, ललित निबंध अशा लेखन प्रकारांचाही विचार करता येईल आणि यासाठी आपल्याला आपली फक्त लिहिण्याचीच नव्हे तर व्यक्त होण्याचीच पद्धत बदलावी लागेल.

एखाद्या दिवशी 'अव्यक्त' असण्याचे कारणही 'व्यक्त होऊन' देऊ शकाल म्हणजे उदा. त्या दिवशी पानावर एक कोरी चौकट काढून आणि या 'अव्यक्त' असण्याचा संदर्भ १९ शब्दांत लिहिण्याचा प्रयत्न करावा. एक गोष्ट पक्की लक्षात ठेवा. 'आपल्या हातून जर एखादी विपरीत गोष्ट घडली', तर 'आपली चूक झाली. अशी आपली चूक नेहमीच का होते? आपण चुकलोच' असे लेबल कृपया स्वत:ला लावू नका. 'या गोष्टीकडे' सकारात्मक दृष्टीनेच पहा. 'कोणतीही गोष्ट किंवा घटना ही पूर्णत: नकारात्मक किंवा सकारात्मक नसतेच. ती फक्त घडलेली घटना असते. तुमचे विचार तिला सकारात्मक किंवा नकारात्मक आकार देतात, म्हणून हातून एखादी विपरीत गोष्ट घडली असेल किंवा तुमच्यावर काही कठीण प्रसंग आला असेल तर त्याबद्दल काहीही न लिहिता 'त्यातून तुम्ही काय शिकलात?' तेवढेच तुमच्या दैनंदिनीत लिहा.

आपण जर चूक लक्षात ठेवली तर तीच चूक पुन्हा होण्याची शक्यता असते, किंबहुना ती चूक आपल्या हातूनच झाली असल्याने त्याचे दडपण मनावर येते, तर काही वेळा न्यूनगंडही निर्माण होतो, पण जर का तुम्ही 'आपण काय चुकलो' याला महत्त्व न देता 'आपण काय शिकलो' हे लक्षात ठेवले तर पुढच्या वेळी आपल्याला आपले शिकणे आठवते आणि आपल्यात वर्तन बदल होतो यावर विश्वास ठेवा. There are no mistakes in life, Only lessons.

शिकण्यासाठी भरपूर चुका करायला परवानगी आहे.

रोज नवनवीन चुका करायला तर पूर्ण परवानगीच आहे, किंबहुना चुका केल्याशिवाय शिकताच येणार

नाही, पण एक चूक एकदाच करायची आहे. एकदाच करायची कारण याचे या चुकीतूनच तुम्ही शिकणार आहात आणि एकदा का शिकलात, तर ती चूक पुन्हा होण्याचा प्रश्नच येत नाही. आपल्याला चुकांना घाबरायचे नाही तर आपल्याला चुकांतून शिकण्याची हिंमत मिळवायची आहे.

दैनंदिनीत आपले 'शिकणे' कमीतकमी शब्दांत, सूत्ररूपात मांडण्याचा प्रयत्न करा. शिकणे म्हणजे केवळ शाळेत किंवा पाठ्यपुस्तकातून शिकणे नव्हे.

'आपण कधीही, कुठेही, केव्हाही आणि कोणाकडूनही काहीही शिकू शकतो' हा मंत्र लक्षात ठेवा.

तुम्हांला शिकण्याचा ध्यास आहे का?

आपण शिकलंच पाहिजे अशी तीव्र आस तुमच्या मनात आहे का? मी मला पाहिजे ते शिकू शकतो असा विश्वास तुम्हांला वेढून टाकतो आहे का? शिकण्यासाठी, जाणून घेण्यासाठी समोरच्या व्यक्तीला विचारायचे धाडस तुमच्यात आहे का?

या सर्व प्रश्नांची उत्तरे 'हो' असतील, तरच तुम्हांला 'आपण प्रत्येक क्षणी सतत शिकत असतो' याची अनुभूती येऊ लागेल.

आपले शिकणे परीक्षेतील मार्कांवरून नव्हे, तर आपल्यात झालेल्या वर्तन बदलातून ओळखता येते. हे बदल ओळखण्यासाठी आपण तीन इंडिकेटर्सची मदत घेऊ या.

हे आहेत आपले रोजचे HIT इंडिकेटर्स :

**H**appiness Indicator.
**I**nspiration Indicator.
**T**ransformation Indicator.

आपल्या दैनंदिनीच्या पानावर वरच्या डाव्या बाजूच्या कोपऱ्यात ३ चौकोन काढायचे आहेत. त्यात रोज पाच पैकी मार्क द्यायचे आहेत. संदर्भासाठी महिन्याच्या शेवटी सरासरी काढून तुम्हांला त्या त्या महिन्याचा इंडिकेटरही शोधता येईल.

- **Happiness Indicator :** आज तुम्ही किती आनंदी आहात? हे तुमचे तुम्हीच ठरवायचे आणि या पहिल्या चौकोनात पाच पैकी मार्क लिहायचे. जेव्हा आपण स्वत:शी मैत्री करतो, आपण जसे आहोत तसे स्वत:ला स्वीकारायला सुरुवात करतो आणि स्वत:शीच मोकळेपणाने बोलू लागतो; म्हणजेच जेव्हा आपण स्वत:शीच प्रामाणिक असतो तेव्हाच हा हॅपिनेस इंडिकेटर सर्वोच्च पातळीवर जातो.
- **Inspiration Indicator :** नवीन शिकण्याची प्रेरणा मिळाली का? स्वकष्टाने, अंत:प्रेरणेने, कशाच्याही किंवा कुणाच्याही मदतीने तुम्ही स्वत:हून काही नवीन शिकणे किंवा शोधणे यासाठी स्वत:ला पाचपैकी मार्क द्यायचे आहेत. शिकत असताना आणि शिकल्यावर जेव्हा आपण कृतज्ञ असतो, आपल्या श्रेयामध्ये इतरांनाही वाटेकरी करून घेतो तेव्हा हा प्रेरणेचा इंडिकेटर सर्वोच्च पातळीवर जातो.
- **Transformation Indicator :** Transformation and Change यामधील फरक तुम्हांला माहीत आहे. आपण पाणी गरम करतो, पण नंतर थोड्या वेळाने ते निवते. म्हणजेच This is changing of temperature, पण जेव्हा आपण दुधाला विरजण लावून त्याचं दही करतो तेव्हा पुन्हा दह्याचे दूध करता येत नाही. दुधाचे दही करणे म्हणजे Transformation. There is no come back, no transformation.

येथे आपल्यात कायमस्वरूपी झालेल्या बदलाचा वेध घेऊन मगच मार्क द्यायचे आहेत आणि रोज झालेल्या बदलाचा पाठपुरावाही करायचा आहे.

मी तुम्हांला माझीच एक गोष्ट सांगतो.

मी पूर्वी पहाटे उठण्यासाठी घड्याळात गजर लावत असे. पहाटे गजर झाला की, 'स्नूझ' चे बटण दाबून दहा मिनिटांनी उठत असे, पण एका क्षणी मी ठरविले की, 'आपण बदलायचेच. आपण जे ठरविले आहे तेच करायचे. गजर झाल्यावर उठायचेच. 'नो स्नूझ' आणि मी बदललो. आता तर मला पहाटे उठण्यासाठी गजरही लावावा लागत नाही. I am transformed.'

**(पृष्ठ क्र. २९ वर)**

# भाषेतील गमतीजमती

**माधव राजगुरू**
भ्रमणध्वनी : ९४२३५६९०८४

> *शाळेत जाण्यापूर्वीच आपण आपली मातृभाषा आत्मसात केलेली असते. बोलताना आपण लिंग, वचन यांचा अचूक वापर करीत असतो. गोष्टीतून चिमणा–चिमणी कळले की, केव्हा तरी प्रश्न पडतो, साळुंकी माहीत आहे; साळुंका? नाही. बालमनातला हा प्रश्न अनुत्तरित राहतो. शाळेत याविषयी समजावून सांगणे म्हणजेच भाषेच्या गमतीजमतींची ओळख करून देणे होय. त्यातून भाषेची गोडी वाढते, भाषाभ्यासाची सवय लागते. त्याविषयी...*

भाषा ही मानवनिर्मित सामाजिक संस्था आहे. जीवनातील सर्व व्यवहार भाषेच्या माध्यमातूनच पूर्ण होतात. भाषा नसती, तर आपले कोणतेच व्यवहार सुकर झाले नसते. लहानपणी भाषेचे अनौपचारिक शिक्षण न घेताही घर आणि परिसरात ऐकून ऐकून आणि सरावाने आपण भाषा आत्मसात करतो. पुढे औपचारिक शिक्षणात आपण लिहायला शिकतो. भाषेच्या संस्कारांची ही रुजवण इतकी खोल असते, की आपल्याला आपली भाषा खूप चांगल्या प्रकारे बोलता येते, लिहिता येते, असे वाटत राहते. वास्तवात मात्र भाषेतील कितीतरी गोष्टी आपल्याला माहीत नसतात. शब्दकोश, ज्ञानकोश, व्युत्पत्तिकोश, भाषेचा इतिहास इत्यादींचा अभ्यास करताना भाषेतील अनेक गमतीदार गोष्टी आपल्याला कळू लागतात. बोलताना आणि लिहिताना वापरले जाणारे शब्द आणि वाक्प्रयोग यांतील भाषिक आणि व्याकरणिक गमतींची काही उदाहरणे पुढे दिली आहेत.

'मी काल तुमच्या घरावरून गेलो'. असे आपण सहज बोलतो. वास्तवात आपण रस्त्यावरून चालतो, घरावरून नव्हे, तरीही 'घरावरून गेलो.' असे बोलण्यात काही चुकीचे आहे, असे वाटत नाही; 'घरावरून' याचा अर्थ 'घरासमोरून', 'घराजवळून' हे आपण गृहीत धरून बोलत असतो. यासारखी आणखी काही उदाहरणे पहा.

१. अंगात सदरा घालणे, की सदरा अंगावर घालणे?
२. बूट पायात घालणे, की पाय बुटात घालणे?
३. बोटात अंगठी घालणे, की अंगठीत बोट घालणे?

भाषेतील लिंगव्यवस्थाही अशीच गमतीदार आहे. स्त्रीलिंग, पुल्लिंग व नपुंसकलिंग या व्याकरणात वापरल्या जाणाऱ्या भाषिक संज्ञा आहेत. मनुष्यप्राण्यातील स्त्री–पुरुष भेदाप्रमाणे इतर सजीवांमध्येही नर किंवा मादी असा भेद आहे. हा भेद स्पष्ट व्हावा म्हणून सर्व सजीवांच्या नामांसाठी स्त्रीलिंग किंवा पुल्लिंग ही संज्ञा वापरली जाते. 'स्त्रीलिंग किंवा पुल्लिंग या संज्ञेत न बसणाऱ्या गटातील नामांसाठी नपुंसकलिंग संज्ञा वापरली जाते. माणसांमधील नर–मादी हा भेद त्यांची शरीररचना, वेशभूषा, बोलणे, चालणे यांवरून ओळखू शकतो. इतर काही प्राण्यांच्या बाबतीतही हा भेद कळू शकतो. उदाहरणार्थ, बैल (नर), गाय (मादी). यावरून व्याकरणात बैल शब्द पुल्लिंगी असतो आणि गाय शब्द स्त्रीलिंगी असतो. काही प्राण्यांच्या बाबतीत मात्र नर–मादी हा भेद ओळखता येत नाही, त्यामुळे असे प्राणी, पक्षी एक तर पुल्लिंगी असतात किंवा स्त्रीलिंगी असतात. उदाहरणार्थ, ससा या प्राण्यामध्ये नर असतो, तशी मादीही असते, पण नरासाठी 'ससा' हा पुल्लिंगी शब्द आहे, तसा मादीसाठी स्त्रीलिंगी शब्दच नाही, म्हणून 'ससा' हा शब्द कायम पुल्लिंगी असतो. यांसारखे

आणखी काही शब्द पहा. मासा (पु.), माशी (स्त्री.), घार (स्त्री.), उंदीर (पु.) इत्यादी.

काही प्राण्यांमधील नर–मादीचा भेद स्पष्ट करण्यासाठी एकाच शब्दाची रूपे बदलून योजलेली दिसतात. उदाहरणार्थ, नरासाठी वापरला जाणारा 'वानर' हा पुल्लिंगी शब्द मादीसाठी वापरताना त्याचे 'वानरी' असे रूप होते. असे इतर शब्द पहा. घोडा–घोडी, कोंबडा–कोंबडी, कुत्रा–कुत्री, कावळा–कावळी.

काही प्राण्यांची नामे मात्र तिन्ही लिंगांत आढळतात. उदाहरणार्थ, 'घोडा' या पुल्लिंगी शब्दाचे 'घोडी' हे स्त्रीलिंगी रूप, तर घोडे हे नपुंसकलिंग रूपही वापरात आहे. 'घोडे' चे बोलीतील रूप 'घोडं' असे आहे. यांसारखे इतर शब्द पहा. कोंबडा–कोंबडी–कोंबडे (कोंबडं)/ कुत्रा–कुत्री–कुत्रे (कुत्रं)/गाडा–गाडी–गाडे (गाडं).

महाराष्ट्र शासनाने १९६२ साली देवनागरी ही मराठी भाषेची अधिकृत लिपी म्हणून जाहीर केली, तेव्हापासून आपण मराठीची बाराखडी वापरत आहोत. ६ नोव्हेंबर २००९ साली महाराष्ट्र सरकारने ॲ आणि ऑ या दोन इंग्रजी स्वरांना मराठी वर्णमालेत स्थान दिले आहे, त्यामुळे स्वरांची संख्या १२ वरून १४ झाली आहे. आता बाराखडी ऐवजी मुलांना चौदाखडी शिकावी लागत आहे. ॲ आणि ऑ स्वर इंग्रजी भाषेतून आलेले असले, तरी त्यातील 'ॲ' हा स्वर पूर्वीपासूनच मराठीत अस्तित्वात आहे, परंतु त्याचे अस्तित्व स्वतंत्र स्वराच्या रूपात दिसत नाही. इंग्रजी शब्दांशी उच्चारसाधर्म्य दर्शविणारे 'ॲ' स्वरयुक्त शब्द मराठीतही आढळतात. (बॅट, मॅड, मॅट, बॅग हे इंग्रजी शब्द ब्याट, म्याड, म्याट, ब्याग असे मराठीत लिहिले तरी उच्चारात काहीही फरक पडत नाही.) हे झाले इंग्रजी शब्द. असा उच्चार असणारे मराठी शब्दही भरपूर आहेत. जसे– ब्याद, भ्याड, ध्यान, प्यादे, म्यान, ख्याती, ध्यास, इत्यादी.

काही लोकरूढ, लोकमान्य शब्दप्रयोग व्याकरण दृष्ट्या चुकीचे असले, तरी ते शब्द तसेच वापरण्याचा लोकाग्रह असतो. असे शब्द भाषाशास्त्रानेही संमत करावेत, असा अलिखित संकेत आहे. उदाहरणादाखल पुढे काही शब्द दिले आहेत.

**मंत्रालय :** आपल्या राज्याचा कारभार ज्या इमारतीमधून चालतो, त्या इमारतीचे नाव 'मंत्रालय' असे आहे. व्याकरणदृष्ट्या हा शब्द येथे चुकीच्या अर्थाने वापरला आहे. 'मंत्र' या शब्दाचे कोशगत अर्थ 'गूढ शक्तियुक्त अक्षरे, वाक्ये' किंवा 'वशीकरण' असे आहेत. 'मंत्र' शब्दापुढे 'आलय' (घर) शब्द जोडून 'मंत्रालय' असा शब्द तयार होतो. या अर्थाने 'मंत्र्यांचे घर' असा त्याचा अर्थ होतो. हा अर्थ लक्षात घेऊन 'मंत्रालय' हा शब्द वापरू नये, असा काहींचा आग्रह होता. याबाबत मोठा खल होऊन अखेर 'मंत्रालय' हाच शब्द वापरण्याचे ठरले. मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांची कार्यालये याच इमारतीत असल्यामुळे हा शब्द योग्य असल्याबाबत सर्वांचे एकमत झाले. ज्यांच्यामार्फत निर्णयांची अंमलबजावणी होते, ते सर्व खात्यांचे 'सचिव' याच ठिकाणी बसतात, म्हणून या इमारतीला 'सचिवालय' म्हणावे, हा प्रस्ताव नाकारण्यात आला. वास्तविक मंत्री + आलय या शब्दांतील इ + आ हे दोन वर्ण एकत्र करून 'मंत्र्यालय' असा संधी होतो. या शब्दातून मंत्र्यांचा अनादर होतो, असे वाटल्यामुळे हा शब्द न स्वीकारता 'मंत्रालय' शब्द स्वीकारला गेला.

**अहिल्या : अहल्या** या दोन शब्दांपैकी 'अहल्या' हा शब्द बरोबर आहे, असे सांगूनही कोणाला ते खरे वाटत नाही. अहिल्या हा शब्द कोणत्याही शब्दकोशात सापडणार नाही; कारण हा एक अर्थहीन शब्द आहे. मूळ शब्द 'अहल्या' असा असून त्याचा अर्थ 'पाच पतिव्रतांपैकी एक' असा आहे. हल म्हणजे नांगर, त्याला 'अ' उपसर्ग जोडून अहल्या म्हणजे न नांगरलेली जमीन असा एक अर्थ सांगितला जातो; परंतु हे कोशगत आणि व्याकरणिक अर्थ सांगून सुद्धा लोकांना पटत नाही. कोशातील अर्थ तुम्ही तुमच्याकडेच ठेवा. आम्ही हा शब्द 'अहिल्या' असेच लिहिणार अशी लोकांची भावना असते,

त्यामुळे बहुसंख्य लोकांनी स्वीकारलेला व रूढ झालेला अहिल्या हा शब्द स्वीकारण्याशिवाय गत्यंतर नाही.

परभाषेतून येणारे शब्द मराठी भाषेने नेहमीच आपल्यात सामावून घेतले आहेत. मराठीत जवळजवळ ८०% शब्द असेच अमराठी आहेत. यातील काही शब्द जसेच्या तसे आले आहेत, तर काही शब्द मराठीच्या प्रकृतीप्रमाणे सोपे करून घेतले गेले आहेत. हे शब्द मराठीशी इतके एकरूप झाले आहेत, की त्या शब्दांचे मूळ जाणून घेण्यासाठी शब्दकोशांचा आधार घ्यावा लागतो. बोलताना कठीण वाटणारे व जोडाक्षरयुक्त शब्द उच्चार सुलभ करून घेतले आहेत. त्याची काही उदाहरणे पहा. दुग्ध, दूध, मार्जार–मांजर, व्याघ्र–वाघ, अग्नी–आग, मत्स्य–मासा, मृत्तिका–माती, तृण–तण, मर्कट–माकड, घर्म–घाम, गर्दभ–गाढव, दंत–दात, बरोबर (फारसी)– बरोबर, डॅम–बीस्ट (damm beast) डांबीस, मुंहजोर–मुजोर, इत्यादी.

परभाषेतून आलेले काही शब्द आपल्या भाषेतील शब्दांना अशा रीतीने चिकटतात, की यातून नवीन शब्द तयार होतात. जसे : (१) मराठीतील उत्तीर्ण या अर्थाचा 'पास' हा इंग्रजी शब्द आहे. या शब्दाच्या मागे नकारदर्शक 'ना' जोडला, की 'पास'च्या विरुद्धार्थी 'नापास' शब्द तयार होतो. (२) 'मालूम' हा ज्ञान, माहीत या अर्थाचा अरबी भाषेतील शब्द आहे; पण मराठीत वापरला जात नाही. मात्र या शब्दाच्या आधी 'बे' हा हिंदी उपसर्ग जोडून 'बेमालूम', 'बेमालूमपणे' असा शब्दप्रयोग मराठीत वापरला जातो. (३) 'माजी' हा अरबी शब्द आहे. कालचा वा पूर्वीचा असा त्याचा अर्थ आहे. या शब्दाला 'आजी' हा मराठी शब्द जोडून 'आजी–माजी' असा शब्दप्रयोग मराठीत रूढ झाला आहे.

**महत्त्व :** 'महत्त्व हा शब्द तिसरीच्या पुस्तकात 'महत्त्व' असा चुकीचा छापला आहे,' असे तिसरीतील एका मुलाने पत्र लिहून बालभारतीला कळविले. सहज गमतीने हा शब्द किती लोकांना बरोबर माहीत आहे, याबाबत चाचपणी केली, तेव्हा जवळजवळ १०० टक्के लोकांनी हा शब्द 'महत्व' असा लिहून दाखविला. वास्तविक 'महत्' या शब्दाला 'त्व' प्रत्यय जोडल्यामुळे शेवटी 'त्' ला 'त्व' जोडून 'त्त्व' असे लिहिणे बरोबर आहे. 'महत्त्व' शब्दात दोन 'त' आहेत, हे अनेकांच्या लक्षात येत नाही.

ह.भ.प. चा चुकीचा विस्तार करण्यात अनेक जण माहीर असतात. ह.भ.प. हे कोणत्या शब्दाचे संक्षिप्त रूप आहे, याची खात्री न करता अनेकांकडून त्याचा चुकीच्या पद्धतीने विस्तार केला जातो. यात परायण हा शेवटचा शब्द आहे. त्याचा अर्थ अनुसरणारा, तल्लीन, आसक्त असा आहे. परायण शब्दाच्या आधी हरी आणि भक्ती हे दोन शब्द येतात. हे तीन शब्द मिळून 'हरिभक्तिपरायण' असा शब्द तयार होतो. याचा अर्थ हरिभक्तीमध्ये परायण म्हणजे हरिभक्ती अनुसरणारा, हरिभक्तीत तल्लीन असणारा, असा होतो. अनेक लोक हा शब्द हरिभक्तपरायण असा लिहितात, बोलतात, पण ते चुकीचे आहे.

दूरदर्शनसारख्या माध्यमाचा जनमानसावर मोठा प्रभाव असल्याचे जाणवते. वृत्तनिवेदन, मुलाखत आदी कार्यक्रमांतून अनेक चुकीचे शब्दप्रयोग, वाक्प्रयोग केले जातात. सामान्य आणि सुशिक्षित माणसेही त्याचे अनुकरण करतात. यातून भाषा संवर्धनाकडे दुर्लक्ष होते, हे प्रकर्षाने जाणवते. 'व्यक्ती' हा स्त्रीलिंगी शब्द आहे. स्त्री किंवा पुरुष या दोहोंच्या बाबतीत हा शब्द वापरता येतो. अलीकडे हा शब्द चुकीच्या पद्धतीने वापरला जात आहे. 'तो व्यक्ती काल माझ्याकडे येऊन गेला'. 'तो 'व्यक्ती' असे म्हणाला.' अशा शब्दप्रयोगामुळे 'व्यक्ती' या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप बदलून पुल्लिंगी झाले आहे. खरे तर 'व्यक्ती' शब्द स्त्रीलिंगी असल्यामुळे 'ती व्यक्ती (स्त्री किंवा पुरुष) असाच शब्दप्रयोग करणे अपेक्षित आहे.

भाषेमध्ये अशा असंख्य रोचक गोष्टी आहेत. भाषाभ्यासात आपण जेवढी रुची दाखवू, तेवढ्या त्या आपल्याला कळू शकतात.

# चला गोष्ट सांगू या...

**फारूक काझी**
भ्रमणध्वनी : ९९२१३८०९६६

*आजीच्या भोवती, शिक्षकांच्या भोवती कोंडाळं करून बसलेली मुले, आवाजाच्या चढउतारासह, हावभाव करीत सुरु असलेली गोष्ट, डोळ्यांत कुतूहल घेऊन, ओठांचे चंबू करीत ऐकणारी आणि गोष्टीत तल्लीन झालेली मुले हे दृश्य अलीकडे दुर्मीळ होत चालले आहे. गोष्ट सांगणे कमी झाले आहे, पण गोष्ट ऐकण्याची मौज मात्र कमी झाली नाही कारण बालमन तसेच आहे. हे जाणूनच गोष्ट कशी सांगावी, कशी निवडावी, गोष्टीतून काय अपेक्षित असावे, गोष्ट सांगण्याचा हेतू याविषयी सविस्तर कथन करणारा हा लेख.*

आज मी तुम्हांला एक गोष्ट सांगणार आहे! असे म्हणताच अख्खा वर्ग सरसावून बसला असे आपल्यापैकी बहुतेक जणांनी अनुभवले असेल. गोष्टीत दडलेली मजा मुलांना खुणावत असते आणि आपण त्यांना त्या जादूची ओळख करून देत असतो. माणसाला बोलण्याची कला अवगत झाल्यापासून माणसाने सुरू केलेले गोष्टी सांगण्याचे सत्र आजही सुरू आहे. काळ बदलला, नवीन तंत्रज्ञान आले, मात्र गोष्ट ऐकण्याची मौज काही कमी झाली नाही, पण कालौघात गोष्ट सांगणारे लोक मात्र हळूहळू लुप्त झाले, कमी होत गेले; कारणे कोणती का असेनात, मात्र गोष्ट ऐकण्याच्या आनंदाला मुले पारखी झाली.

गोष्ट सांगणे आणि ऐकणे याच्याशी आपल्या जीवनाची नाळ घट्ट जोडली गेलेली आहे. कालपरत्वे त्यात बदल झाले, मात्र तरीही मुलांच्या भावविश्वाचा एक महत्त्वाचा हिस्सा 'गोष्ट' आजही टिकून आहे. असं काय झालं की गोष्टी हरवून गेल्या? गोष्टी सांगणे कमी होऊन गेले? आपण या लेखात याबाबत तर बोलणार आहोतच; याचसोबत गोष्टी सांगण्यापूर्वी, सांगताना आणि नंतर काय करावे आणि काय करू नये याचीही चर्चा करणार आहोत.

## • मुलांना गोष्टी का सांगायच्या?

लहान वर्गात जर रंजक गोष्टी सांगितल्या गेल्या, तर मुले शाळेत टिकावीत आणि रमावीत यासाठी वेगळे काही प्रयत्न करण्याची गरजच भासणार नाही. गोष्टी मुलांवरती जादुई प्रभाव पाडत असतात. गोष्ट सांगायची तर मुलांनी बोध घ्यावा म्हणून, त्यांच्यावर संस्कार व्हावे म्हणून हा समज इतका घट्ट होत गेला की गोष्टीतील आणि गोष्ट सांगण्यातील मजाच हरवून गेली. मुलांना निखळ आनंद मिळावा म्हणून गोष्ट सांगणे घडले तर वर्ग शिकण्याची एक सुंदर जागा बनतो, याची प्रचिती गोष्ट सांगणाऱ्या शिक्षकांना येतेच येते. मग तुम्ही म्हणाल का बरे सांगायची गोष्ट? जाणून घेऊ या त्यामागील कारणे.

१) **आनंदप्राप्ती** : 'गोष्ट सांगणार' असे ऐकले तरी वर्गाचं वातावरण क्षणात बदलून जाते. उत्सुकता शिगेला पोहोचते आणि अख्खा वर्ग गोष्टीच्या नावेत स्वार होऊन कल्पनेच्या प्रदेशात फिरून येतो. अशी आनंदप्राप्ती हे गोष्टीचे मुख्य वैशिष्ट्य आहे आणि ते असायलाही हवे.

२) **ऐकण्याच्या क्षमतेचा विकास** : ऐकणे हे केवळ बोलण्याची पूर्वतयारी नसते. हे कौशल्य समज

वाढविणारे आणि भावी आयुष्यात सुसंवादी बनण्याचीही पायरी मानले गेले आहे. मार्क ट्वेन म्हणतो, ऐकण्यापेक्षा बोलणे जास्त महत्त्वाचे असते, तर आपल्याला दोन तोंडे आणि एकच कान असता. गोष्टी या ऐकण्याच्या सवयीला चालना देतात.

३) **अंदाज बांधण्याचे प्रशिक्षण** : गोष्टीत पुढे काय घडेल, याचा विचार करून मूल अंदाज बांधायला लागते. तर्क-वितर्क करायला लागते. मुलांना व्यवहारात ही सवय खूप उपयोगी पडते. त्यामुळे मुले एखाद्या समस्येचा अनेक अंगांनी विचार करायला लागतात. हे शिकणेच असत नाही काय?

४) **कल्पकतेला पंख नवे** : आनंद आणि ज्ञान यांच्यापुढे जर कोणती गोष्ट असेल तर ती आहे कल्पकता आणि विचार. याचाच अर्थ असा होतो की, मानवी जीवनात कल्पकतेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. गोष्टीत तर अशा कल्पकतेला भन्नाट वाव असतो.

५) **भाषिक, भावनिक विकास** : गोष्ट ऐकताना मुले तिच्याशी इतकी समरूप होऊन जातात की, त्यातील आनंद त्यांचा आनंद बनतो. त्यातील दु:ख त्यांचे दु:ख बनते. हा भावनिक विकास परंपरेने आपल्याकडे घडविला जात आला आहे. गोष्ट हे त्याचे उत्तम साधन मानले गेले आहे.

गोष्ट ऐकताना मूल अनेक नवीन शब्द ऐकते, उच्चार, हेल आणि शब्दांशी खेळणे शिकते. भाषा विकासासाठी गोष्टीचा वापर न करता भाषेचा रंजक वापर करण्याची किमया साधता आली पाहिजे.

६) **नात्याचा परीघ विस्तारतो** : गोष्ट सांगताना गोष्ट सांगणारा व ऐकणारा यांच्यात जे नाते निर्माण होते ते अधिक अर्थपूर्ण आणि दृढ स्वरूपाचे असते. मग ते नाते कोणतेही असेल. मुलांना तुम्ही हवेहवेसे वाटता. गोष्ट या नात्याचा आधार ठरते.

यात आणखी अनेक मुद्दे समाविष्ट करता येतील. काही ठळक मुद्द्यांचा येथे उल्लेख केला आहे.

- **गोष्ट निवडण्यापूर्वी...**

गोष्ट निवडताना गोष्ट सांगणाऱ्याला थोडे चोखंदळ व्हावे लागते. बोध देणे, संस्कार करणे, काहीतरी शिकविणे हेच डोक्यात ठेवून गोष्टी निवडण्यापेक्षा मुलांचं निखळ मनोरंजन करणाऱ्या गोष्टी निवडल्या, तर मुलांना त्या जास्त आवडतील. चांगल्या गोष्टी काहीना काही शिकवीतच असतात.

१) मुलांचा वयोगट आणि आवड विचारात घेऊन गोष्ट निवडावी.

२) बोध, संस्कार, सार, शिकविणे हे ओढून-ताणून माथी मारणे नको; उलट मुलांना निखळ आनंद देईल अशीच गोष्ट निवडावी.

३) बोजड भाषा असणारी, माहितीचा भरणा असलेली, खूप छोटी किंवा खूप मोठी गोष्ट निवडू नये.

४) मुलांना अंदाज बांधायला, कल्पना करायला लावणाऱ्या गोष्टी निवडाव्यात.

- **गोष्ट सांगताना काय काय करावे? :**

गोष्ट सांगणारे कुणीतरी बसले आहे आणि ऐकणारे उत्सुक कान आणि डोळे अवतीभोवती जमलेले आहेत हा प्रसंग मनावर अगदीच प्रभाव टाकून जातो. असे जवळ बसून गोष्ट ऐकताना मुले मनानेही आपल्या जवळ आलेली असतात. गोष्ट सांगताना अशा काही गोष्टी करून पहिल्या तर गोष्ट सांगण्याची रंगत अधिकच वाढत जाते. गोष्ट सांगताना खालील काही गोष्टी जरूर करून पहायला हव्यात.

१) **मुलांच्या वयोगटानुसार व आवडीनुसार गोष्ट :** मुलांचा वयोगट कोणता आहे हे पाहूनच गोष्ट निवडायला हवी. तसेच त्यांची आवडही लक्षात घ्यायला हवी. लोककथा, परीकथा, प्राणिकथा, साहसकथा, शौर्यकथा अशा नानाविध गोष्टी

आपण सादर करू शकतो. लक्षात असू द्या, गोष्टीत बोध असलाच पाहिजे, त्यातून काहीतरी शिकवण मिळालीच पाहिजे हा अट्टाहास सोडून दिला पाहिजे. उदा. 'गेंडूबाचं चित्र' या कथेतली मजा अनुभवण्यापेक्षा 'भूतदया' हा बोध सांगण्यावर जर आपण भर दिला तर गोष्टीतील रसच निघून जाईल.

२) **गोष्टीच्या रसाशी तन्मय होणे :** आपण जी गोष्ट सांगत आहोत त्या रसाशी तन्मय होऊनच गोष्ट सांगितली पाहिजे. अन्यथा गोष्ट सांगणे निरस आणि सपक होऊन जाईल. मुले कंटाळून जातील.

३) **अभिनय आणि आवाजातील चढउताराचा वापर :** गोष्ट सांगताना अभिनयाचा आणि आवाजातील चढउतारांचा कौशल्याने उपयोग केला गेला, तर मुले अशा कथा कधीच विसरत नाहीत. उदा. आप्पासाहेब खोत यांची 'गवनेर' ही कथा ऐकताना श्रोता कधी कथेत सहभागी होऊन जातो कळतही नाही. ससा आणि कासवाच्या गोष्टीत आपणही त्या शर्यतीत सामील होतो. ही जादू अभिनयाच्या बळावर घडवून आणता येते.

४) **मधे-मधे प्रश्नांचा भडिमार नको :** गोष्ट सांगताना मुलांचे अवधान आहे की नाही हे पाहण्यासाठी, मुलांची उत्सुकता ताणून धरण्यासाठी, कल्पना करण्यासाठी म्हणून कथेत एखादा दुसरा प्रश्न वापरता येईल. मुलांना गोष्ट आवडली तर मुले मन लावून ऐकत राहतात. त्यासाठी प्रश्नांचा भडिमार नको, नाही तर गोष्ट निरस होऊन जाते आणि उरतात ती प्रश्नोत्तरे; ज्यात मुलांना अजिबात रस नसतो.

५) **नवनवीन गोष्टी सांगायला हव्यात :** बऱ्याचदा वर्गात मुलांना गोष्टी वाचून दाखविण्यावर जास्त भर दिला जातो. पुस्तक वाचून दाखविण्याचे खूप फायदे असले, तरीही गोष्ट सांगण्यात जो जिवंत आणि रसरशीत अनुभव दडलेला असतो तो वाचलेले ऐकण्यात नक्कीच नाही. त्यांना बालपणाचा आनंद अनुभव द्यायचा असेल तर नवनवीन गोष्टी शोधत रहायला हवे. सजगपणे गोष्टींचा संग्रह करायला हवा.

६) **मुलांचा सहभाग :** गोष्ट सांगत असताना एखाद्या प्रसंगाशी मिळता जुळता अनुभव मुलांना मध्येच सांगायचा असतो. अशावेळी मुलांना थोडक्यात अनुभव सांगू द्यावा आणि गोष्ट पुन्हा रुळावरून धावू द्यावी. गोष्टींना मुलांच्या अनुभवांशी जोडून घेतल्यास त्या कृत्रिम आणि रटाळ होणार नाहीत. त्यासाठी आवश्यक तिथे मुलांचा सहभाग घ्यायला काहीच हरकत नाही. उदा. 'ऊ टू ची गोष्ट' यात मुलांना पुनरावृत्ती झालेले शब्द उच्चारायला खूपच मजा वाटते.

भाजी चिरू कशी? चरा चरा

शिजवू कशी? रटा रटा

खाऊ कशी? मटा मटा

यातले चरा-चरा, रटा-रटा, मटा-मटा अशी पुनरावृत्ती होणारे शब्द मुले एका सुरात सांगू लागतात. हा एक आनंददायी अनुभव असतो. दोघांसाठीही.

७) **साधनांचा वापर :** हैद्राबाद येथे टाटा ट्रस्ट आयोजित समर स्कूलला उपस्थित राहण्याची मला संधी मिळाली. तेथे दीपा किरण या जागतिक स्तरावरील कथाकथनकारांचा कार्यक्रम अनुभवता आला. मी तर आश्चर्यचकित झालो. दैनंदिन जीवनातील कितीतरी साधने घेऊन त्यांनी अत्यंत प्रभावी पद्धतीने गोष्टी सांगितल्या. खरे तर अशा पद्धतीने गोष्ट सांगणे ही आपली लोकपरंपरा

आहे. बाहुल्या, कठपुतली, चित्रकथा, एकपात्री अशा कितीतरी प्रकारे गोष्टी सांगण्याची परंपरा आपल्याला लाभली आहे. आपणही अशा साधनांचा वापर करून आपली गोष्ट अधिक परिणामकारक करू शकतो. काळजी एवढीच घ्यायची की साधने जास्त होऊ नयेत.

## गोष्टी आणायच्या कोठून ?

मासिके, वर्तमानपत्रातील कथा वाचून दाखविण्या–पेक्षा शिक्षक, पालक आणि कार्यकर्त्यांनी किमान पन्नास कथांचा स्वत:चा एक कोश तयार करावा. त्यातील कथा सांगून सराव करून पाहावा. अशा कथा कोठून आणायच्या? त्यासाठी आपण खालील स्रोतांचा उपयोग करू शकतो.

१. पंचतंत्र, जातक कथा, दंतकथा, इ.

२. देशोदेशीच्या लोककथा, परीकथा.

३. आपापल्या भागातील लोककथा.

४. ऐतिहासिक कथा.

५. ज्यांची गोष्ट बनू शकेल अशा स्थानिक घटना.

या सर्व मांडणीतून गोष्ट सांगण्याचा प्रयत्न केला आहे. हेतू हाच की हरवलेली गोष्ट पुन्हा सापडेल आणि वर्गावर्गात, घराघरात तिचा झरा पुन्हा जिवंत होऊन वाहू लागेल. मुलांच्या आनंदात भर घालत राहील. चांगल्या गोष्टींतून मुलांचे आपोआप शिकणे घडत जाते. त्यासाठी वेगळ्या तात्पर्याची वा बोधाची गरजच नसते. तेव्हा चला आता, आपणही गोष्ट सांगते होऊ या. मुलांना आनंद देणाऱ्या आणि कल्पक बनविणाऱ्या गोष्टी सांगू या.

■■■

**(पृष्ठ क्र. २२ वरून)**

लक्षात ठेवा, आपण जे ठरवू ते करूच शकतो याचा अनुभव घ्यायला सुरुवात केली की, त्याची मालिकाच सुरू होते. फक्त आवश्यकता असते तुमच्या जिद्दीची, चिकाटीची आणि स्वत:वर असणाऱ्या विश्वासाची.

स्वत:त थोडा थोडा बदल करायला सुरुवात करा.

आपल्याला थोडे थोडे मिळणारे यशच आपल्याला आपल्यात लपलेली शक्ती ओळखायला मदत करते आणि मोठ्या यशाकडे खेचून घेऊन जाते.

आपण जाणीवपूर्वक स्वत: करीत असणाऱ्या या कायमस्वरूपी बदलांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी या तिसऱ्या चौकोनात तुम्हीच तुम्हांला निरखून मार्क द्यायचे आहेत.

आता महत्त्वाची गोष्ट : HIT Indicators चे मार्क हे परीक्षेसाठी नाहीत आणि कोणाला दाखवून 'चमकोगिरी' करण्यासाठी तर नाहीतच नाही.

हा आहे आपणच घेतलेला आपला वेध.

आपण आपल्याशीच केलेली स्पर्धा, स्वत:ला पुढे घेऊन जाण्यासाठी.

लक्षात घ्या, एखाद्या दिवशी सगळे चौकोन रिकामे पण राहतील, हरकत नाही कारण दैनंदिनी ही आपली खाजगी बाब आहे आणि म्हणूनच, आपण आपल्याशी पूर्णत: प्रामाणिक राहूनच दैनंदिनीतून व्यक्त होणार आहोत.

दैनंदिनी म्हणजे आपल्या यशाच्या, आपल्या शिकण्याच्या किंवा आपल्यातील बदलांच्या केवळ नोंदी नाहीत. दैनंदिनी हा आपल्यातील बदलांचा वेध घेण्याचा केलेला एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

तुम्ही स्प्रिंगबोर्डच्या टोकावर उभे राहिलात तरच वर उसळता, अन्यथा तेथेच राहता. दैनंदिनी हा तुमच्यासाठी स्प्रिंगबोर्ड आहे, वर्तमानातून भविष्यात उसळी घेण्यासाठी.

■■■



१७ डिसेंबर : सुरक्षा दीप शोधक सर हंफ्रे डेव्ही जन्मदिन १७७८

# आमची दुनिया बोलक्या बाहुल्यांची...

**दीपाली बाभुळकर**
जि. शि. व प्र. संस्था, अमरावती, भ्रमणध्वनी : ८८०५४१०८८७

'करील मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभुशी तयाचे' या साने गुरुजींच्या ओळी अगदी सार्थ आहेत. विविध अध्ययन अनुभव मुलांना देत असताना ते अनुभव आणखी जिवंत कसे होतील याचा विचार करताना मला बोलक्या बाहुल्या आठवल्या. या बाहुल्या तयार करणे हे फार कौशल्याचे काम... खरे तर विद्यार्थ्यांचे अवधान अभ्यासात टिकवून ठेवण्यासाठी, मनोरंजनातून विविध बोधपर बाबी समजावण्यासाठी, कलाविषयक रुची वाढविण्यासाठी, सांस्कृतिक कला संवर्धनासाठी, अध्ययन-अध्यापनातील रंजकता वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांची संवेदनशीलता वाढविणारे, जाणीव दृढ करणारे महत्त्वाचे माध्यम म्हणजेच विविधरंगी हलत्या बोलत्या बाहुल्या...

मराठी, हिंदी, इंग्रजी, कार्यानुभव विषयाच्या तासिकांमध्ये विशेष शिबिरांमध्ये, सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये बाहुल्यांचा सहज उपयोग आपल्याला करता येतो. त्याकरिता विविध माध्यमांचा वापर आपण करू शकतो. त्यांपैकी कागदी लगद्याच्या बाहुल्यांची मी निवड केली. लहान मुलांना आवडणारे ससा, एलियन, मुलगी, आई, आजी, बाबा, दादा अशा बाहुल्या तयार करून त्यांना मजेदार नावे सुद्धा दिली. उदा. येडा याकुब, पिंटू, सोनू-मोनू इ. मुलांना आवडणाऱ्या मोटू पतलू, मिनी, चिंगी या बोलक्या बाहुल्या पण माझ्याकडे आहेत.

कोणत्याही बाहुली नाट्याचा आत्मा म्हणजे त्याचे कथानक. याकरिता मी विविध सामाजिक बाबी, जसे : स्त्री

> *लहान मुलांच्या भावविश्वामध्ये बाहुल्यांना अनन्यसाधारण महत्त्व असते, पण आजकाल या बाहुल्या खेळणे कमी झालेले आहे. याच बाहुल्यांच्या माध्यमातून बोलक्या बाहुल्यांचा प्रयोग सुरू झाला आणि विद्यार्थ्यांचे अवधान टिकवून ठेवण्यासाठी, अध्ययन-अध्यापनात रंजकता आणण्यासाठी, विविध मूल्ये रुजविण्यासाठी त्यांचा कसा उपयोग झाला याविषयी...*

पुरुष समानता, लेक वाचवा-देश वाचवा, पर्यावरण संवर्धन, मुलींची सुरक्षितता, शिक्षणाचे महत्त्व, आरोग्यविषयक जनजागृती, व्यसनमुक्ती यांविषयी कथानक तयार केले. वारंवार येणाऱ्या सामाजिक विषयांचा व शैक्षणिक बाबींतील अडचणींचा समावेश या कथानकांमध्ये केला. त्यामुळे बाहुलीनाट्याचा प्रभाव वाढला. फक्त बाहुल्या व कथानक असून जमत नाही, तर त्याकरिता सादरीकरणाचे कौशल्य असणे गरजेचे असते. आवाजातील चढ-उतार, संवाद कौशल्ये अवगत करून घेतली. आठ वर्षे काम केल्यावर संधी मिळाली ती सांस्कृतिक आणि प्रशिक्षण केंद्राद्वारे आयोजित 'शिक्षणामध्ये बाहुलीनाट्याची भूमिका' या प्रशिक्षणामध्ये भाग घेण्याची. बाहुलीनाट्याबाबत माहिती झाली. बाहुलीनाट्य सादर करताना आवश्यक असणारी आणखी एक बाब म्हणजे बाहुलीनाट्याचे स्टेज आकर्षक आणि सहज उचलून नेता येईल असे असावे लागते. ते तसे तयार केले.

बोलक्या बाहुल्यांचा खेळ पाहणार म्हटल्याबरोबर मुलांच्या उत्साहाला उधाण येते. मी बाहुलीनाट्याची पार्श्वभूमी सांगितल्यानंतर प्रत्यक्ष कथानकाच्या रूपाने मुलांना एकेक विषय वेगवेगळ्या बाहुल्या समोर येऊन जेव्हा उलगडून दाखवतात तेव्हा त्यांच्या आनंदाला पारावार उरत नाही. टाळ्यांचा कडकडाट, त्यासोबत गाणे गुणगुणत ते आपला सहभाग नोंदवितात. त्यांच्या डोळ्यांतील चमक व आनंद माझा उत्साह वाढवितात. प्रत्येक विषयाच्या मधे निवेदनाकरिता काही क्षण वापरून मी पुन्हा दुसरा खेळ सुरू करते. मुलांना उत्सुकता असते की आता आम्हांला काय दाखविणार आहेत? कार्यक्रम सादर केल्यानंतर त्या सादरीकरणाबाबत मुलांशी चर्चा करून बाहुलीनाट्यातील बाबींवर प्रकाश टाकण्यात येतो. त्यामुळे मुलांच्या मनातील विचार प्रकट करण्याची संधी त्यांना मिळते. या बाहुलीनाट्याबरोबरच आरोग्यविषयक बाबींमधील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे हात धुणे किती आवश्यक आहे याचे प्रात्यक्षिक मुलांकडून करून घेतले जाते. मी स्वच्छ हात असणाऱ्या मुलांना पाचशे रुपये बक्षीस देणार आहे असे सांगते. अनेक जण हात वर करून गलका करतात की, आमचे हात स्वच्छ आहेत, पण या प्रात्यक्षिकाने त्यांच्या लक्षात येते की, स्वच्छ दिसत असणाऱ्या हातांवर किती सूक्ष्म धूळ असते. किटाणू असतात. हात धुण्याचे महत्त्व मनावर बिंबविण्यात या प्रयोगाची मनोरंजनातून मदत होते. याशिवाय मनोरंजक गाणी आणि गोष्टी यांमुळे मुलांना हा कार्यक्रम संपूच नये असे वाटते. मनोरंजनासोबतच विविध शैक्षणिक बाबी, आरोग्यविषयक चांगल्या सवयी, भौमितिक आकृत्या, म्हणी व त्यावर आधारित गोष्टी, पशुपक्ष्यांविषयी माहिती मुलांना सहज देता येते. या माध्यमाद्वारे दिलेल्या माहितीचा मुलांना खूप फायदा होतो. विविध ठिकाणी कार्यक्रम सादर केल्यानंतर भेटणारी मुले, पालक कित्येक दिवसांनंतर सुद्धा कार्यक्रम लक्षात असल्याचे सांगतात.

'मीना राजू मंच' अंतर्गत किशोरवयीन मुलींच्या समस्यांबाबत मुलींना फक्त माहिती देऊन थांबण्यापेक्षा बाहुलीनाट्य दाखवून नको असलेला स्पर्श कसा ओळखावा, स्व-संरक्षणाकरिता आपण काय करावे, माझे शरीर व त्याची ओळख, स्व-ची जाणीव, भावना कशा व्यक्त करायच्या यांबाबत प्रात्यक्षिकासह मी मांडणी करते.

असेच एका शिबिरामध्ये मुलींना मी ही माहिती दिली. दुपारच्या जेवणाच्या वेळी तीन-चार मुलींचा समूह माझ्याजवळ आला. 'काय करावे व काय करू नये सांगावे की न सांगावे' या मानसिकतेत त्या होत्या. त्यांना विचारले असता भयानक सत्य बाहेर आले. तिथे जेवण बनविण्याकरिता आलेला आचारी मुलींना जेवण घेताना अचकटविचकट बोलून त्रास देत होता. मुलींनी शिबिरात ऐकलेली माहिती ऐकून त्याला विरोध करीत सर्वांसमोर मुली त्याला रागावल्या. ही बाब मला सांगताना त्यांना आनंदच होत होता. अशा अनेक बाबी ज्या त्यांनी आजपर्यंत घरच्यांना सुद्धा सांगितलेल्या नव्हत्या, त्या बाबी माझ्याजवळ सर्वांसमोर मुली खुलेआम बोलतात. हा विश्वास मुलींच्या मनात निर्माण करण्याचे काम बाहुलीनाट्यामुळे झाले.

महाविद्यालयातील मुलांनी राष्ट्रीय सेवायोजन शिबिरातील कार्यक्रमानंतर कबूल केले की आम्ही मुलींना यापुढे त्रास देणार नाही.

### स्वच्छतेचे महत्त्व :

मुलांना कितीही वेळा सांगितले तरी मुले जेवणापूर्वी हात धुत नसत. मनात विचार आला, की आता काय करावे? मग मी मदत घेतली सचिन तेंडुलकर यांची.. सचिन म्हणजे आमच्या खेळातला, हात धुण्याची चांगली

सवय लावणारा मुलगा. आमचा लहान सचिन ग्राऊंडवर क्रिकेट खेळायला जातो. आल्यावर हातपाय न धुताच जेवतो. त्याला काही दिवसानंतर कावीळ होते अशी थीम तयार केली व नंतर प्रत्यक्ष हात धुण्याचे महत्त्व प्रात्यक्षिकातून मुलांसमोर मांडले. आता ही मुले हात धुतल्याशिवाय जेवायचा विचारही मनात आणत नाहीत. एवढेच नव्हे, तर स्वच्छतादूत बनून, इतरांनाही हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवीत आहेत.

एकदा तर गंमतच झाली... एका शाळेमध्ये कार्यक्रमाला गेले असताना मुलांनी कार्यक्रमाचा खूप आनंद घेतला. सगळ्या बाहुल्या आवरून ठेवत असताना लक्षात आले की माझा बाहुला सचिन कुठे दिसत नाही. आजूबाजूला शोधून झाले, शिक्षकांना विचारून झाले... पण सचिन काही दिसेना. मग शेवटी कोपऱ्यात उभ्या असलेल्या एका छोट्या मुलाकडे लक्ष गेले. त्याने हातात मागे काहीतरी घेतले होते आणि तो माझ्याकडे कधी लक्ष जाते असे बघत होता. मी त्याच्याकडे पाहिल्यावर तो गोड हसला. माझ्याजवळ आला म्हणाला, ''मॅडम, याला घरी घेऊन जाऊ का? माझा भाऊ हात धुत नाही. मग हा सचिन त्याला सांगेल की, रोज हात धुवायचे. नाही धुतले तर आपल्याला वेगवेगळे रोग होतात.'' बाहुली सापडताच माझा जीव भांड्यात पडला. त्याला पटले होते आणि बाहुली सांगते आहे ते आपण तर ऐकले पाहिजेच, पण आपण मित्रांनाही सांगितले पाहिजे याची जाणीव झाली होती. बाहुल्यांचा हा सकारात्मक परिणाम पाहून या मुलाने ती बाहुली घेतली याचा राग तरी कसा येणार? मी त्याला कसेबसे समजावून सांगून पुढच्या कार्यक्रमाला ती बाहुली आवश्यक आहे असे सांगितले आणि त्याच्याकडून ती बाहुली काढून घेतली. कार्यक्रमाचा माझा हेतू सफल झाला याचा मला आनंद झाला.

मुले त्यांच्या आवडत्या मोटू-पतलू, ससा-ससुली यांना बघतात तेव्हा ते सगळे भान विसरून जातात. मनिबाई गुजराती हायस्कूलमध्ये कार्यक्रम सुरू होता जवळपास दीड हजार मुले कार्यक्रमाचा आस्वाद घेत होते. ठरलेल्या वेळी शाळा सुटल्याची घंटा वाजली पण एकही मूल कार्यक्रमातून उठून गेले नाही. कार्यक्रम पाहताना तहान-भूक हरपून मुले कार्यक्रमातून आनंद घेत होती.

हे झाले मुलांच्या बाबतीत, पण ज्या मातापालक जेवणापूर्वी, बाळाची शी धुतल्यावर, स्वयंपाक करण्यापूर्वी हात धुत नसत, डाव्या हातात अंगठी घालत त्यांनाही आमच्या बाहुल्या बाहुलीनाट्यात मनोरंजनातून समज देतात व त्याही हसत हसत कबूल करतात की... मी आता यानंतर हात नक्कीच धुणार, डाव्या हातात अंगठी अजिबात घालणार नाही.

**शौचालयाचा वापर व बांधकामाचे महत्त्व :**

आमच्या बाहुल्या विविध ग्रामसभा, पालक सभांमधून शौचालयाचा वापर व बांधकामाचे महत्त्व सांगतात. त्यामुळे ग्रामसेवकांना मदतच होत असून स्वच्छतेचा संदेश मुले व बाहुल्या घरोघरी पोहोचवितात.

*सकाळी सकाळी गेले बाई,*
*सापच दिसला मला गं आई*
*मला संडास बांधून हवा*

हे गाणे घरोघरी प्रसिद्ध आहे. 'अमरावती आकाशवाणी' च्या माध्यमातून जिल्हा परिषद अमरावती द्वारे 'स्वच्छतेचा जागर' या कार्यक्रमात आमच्या बाहुलीनाट्याने समाज जागृतीकरिता मोठे योगदान दिले आहे. त्यामुळे शहरी व ग्रामीण भागात स्वच्छतेचे संदेश पोहोचविण्यास मदत झाली. सध्या वारंवार या कार्यक्रमाचे प्रसारण करून जनजागृती करण्यात येत आहे. ज्यांनी हा कार्यक्रम ऐकला त्यांच्याकडून कार्यक्रमाबाबत खूप चांगले अभिप्रायही येत आहेत.

शिक्षणक्षेत्रात शिक्षणवारीला एक महत्त्वाचे स्थान आहे. वारीमध्ये माझ्या कार्यक्रमाची निवड झाली. संपूर्ण

महाराष्ट्रातील शिक्षकांपर्यंत बाहुलीनाट्याची अध्यापनात कशी मदत घ्यावी याचे प्रात्यक्षिक दाखविता आले. शिक्षणवारीच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रात माझी बाहुलीनाट्य कलाकार म्हणून एक वेगळी ओळख तयार झाली. यातून विविध शिक्षकांनी प्रेरणा घेत काम करण्यास सुरुवात केली. बाहुल्यांच्या वापरातील सहजता या निमित्ताने सर्वांसमोर मला मांडता आली.

माझ्या शाळेतील वंचित घटकातील बालकांची उपस्थिती वाढविण्याकरता मला बाहुल्यांची फार मदत झाली. छोट्या छोट्या कारणासाठी गैरहजर राहणारी मुले बाहुलीसोबत बोलता येते म्हणून रोज शाळेत येऊ लागली. पालसिंग नावाचा विद्यार्थी तर चक्क सांगायचा, 'मी तुमच्यासोबत बोलायला नाही, बाहुली सोबत बोलायला शाळेत येतो...' आहे ना कमाल!

हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे झालेल्या शारीरिक शिक्षण या विषयावरील पहिल्या जागतिक संमेलनात २८ देशांच्या प्रतिनिधींसमोर व प्रदर्शनाला भेट देणाऱ्या सुमारे ५० हजार लोकांसमोर बाहुलीनाट्य सादर करण्याची संधी मिळाली. यातून आरोग्य व शिक्षण यांचे महत्त्व पटवून देण्यात आले.

श्री संत अच्युत महाराज संस्थानात दरवर्षी बालमहोत्सवात परिसरातील हजारो विद्यार्थ्यांसमोर बाहुलीनाट्य सादर करण्याची संधी मला मिळते. आजपर्यंत सुमारे ३५० पेक्षा जास्त शाळांमध्ये बाहुलीनाट्य प्रयोग करून मुलांना बाहुलीनाट्यातून अभिव्यक्तीच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. प्रत्यक्षात मुलांना बाहुल्यांची हाताळण्याची संधी दिली आहे. या वेळी प्रामुख्याने जी मुले सतत मागेमागे राहतात, इतर कार्यक्रमांत सहभागी होत नाहीत अशा मुलांना शिक्षकांच्या मदतीने शोधून त्यांना बाहुल्यांना हाताळण्याची, बोलण्याची संधी उपलब्ध करून देते त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो व ती मुले सुद्धा सहभागी होतात. त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी मदत होते.

एका शाळेमध्ये मी कार्यक्रमाला गेले. तीनशे साडेतीनशे विद्यार्थी समोर बसलेले होते. कार्यक्रम पाहताना त्यांचा आनंद ओसंडून वाहत होता, पण एक गोड मुलगी समोर बोलविल्यानंतर सुद्धा येत नव्हती. चिंगीने जेव्हा दिसण्यापेक्षा असण्यावर विश्वास ठेव असे आपल्या गमतीदार शैलीत सांगितले, तेव्हा ती ताई हळूच उठून समोर आली. चिंगीला हातात घेतले, ती कशी बोलते, तिची हालचाल कशी होते हे न्याहाळून पाहिले आणि हळूच हे सर्व करून सुद्धा पाहिले. मुलांमध्ये आत्मविश्वास वाढविण्यासाठी यापेक्षा मोठी गोष्ट कोणती असेल!

फक्त सामान्य शाळेतच नाही तर वीटभट्ट्यांवर धूळ, धूर प्रदूषणाच्या विळख्यात हरवलेले बालपण या बाहुल्यांमुळे पुन्हा फुलू लागले. मुलांचे पालक त्यांना स्वतःपासून दूर ठेवायला तयार नव्हते. समजावून सांगितले पण ऐकले नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही बोलकी बाहुली चिंगी सोबत वीटभट्टी पहायला गेलो. मुलांनी गराडा घातला. पालकांना पण कौतुक वाटले. मुलांना चांगले काहीतरी शिकायला मिळेल म्हणून मुलांना पाठवायला ते तयार झाले. सगळ्यांच्या प्रयत्नांना यश आले. वीटभट्टी शाळेत मुलांना भाषिक संबोध, गणित, विविध प्रकारचे खेळ हसत खेळत शिकविले जात होते. याशिवाय बालवाचनालय सुद्धा सुरू करण्यात आले.

फुटपाथ शाळेमध्ये बाहुलीनाट्याचा कार्यक्रम होता. ही सगळी दुपारी भीक मागणारी, फुगे विकणारी अशी मुले-मुली होती. त्यांना स्वच्छतेचे महत्त्व सांगितल्यानंतर दुसऱ्या दिवशी स्वच्छ आंघोळ करून

जुनेच पण व्यवस्थित कपडे घालून मुले आली, तेव्हा ती ओळखू सद्धा येत नव्हती. इतका बदल एका कार्यक्रमामुळे त्यांच्यात झालेला दिसला. त्यानंतर कधीच त्या मुलांनी माझ्याकडे भीक मागितली नाही, उलट आम्ही रोज अभ्यास करतो हे सांगायला ती विसरली नाहीत.

मी स्वतः तंत्रस्नेही असल्याने मुलांना स्काईप, गुगल मीट, झूम, व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून सुद्धा बाहुलीनाट्याचा आस्वाद देत आहे. या वर्षी तर मुलांची उन्हाळी शिबिरे सुद्धा ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आली. मुलांनी खूपच छान प्रतिसाद दिला. माझ्या यू-ट्यूब चॅनलवर पाहून स्वतः बाहुल्या तयार केल्या. त्यापैकी एक आराध्य वानखडे हा तर 'जीवन शिक्षण' च्या अंकात पण बाहुलीसह झळकला आहे. सहाव्या राष्ट्रीय बाहुलीनाट्य महोत्सवासाठी 'माझी दुनिया बोलक्या बाहुल्यांची' या कार्यक्रमात मुलांची सुरक्षितता या भागाला भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

विदर्भातील एकमेव महिला बोलक्या बाहुल्या कलाकार म्हणून मान्यता व प्रसिद्धी सुद्धा मिळाली आहे. मुलांमध्ये व माझ्यामध्ये विश्वासाचे नाते तयार झाले आहे. ही बाहुली नाट्याची सर्वात मोठी यशस्विताच होय. मुलांमध्ये मूल होऊन मला मिसळता येते, त्यांच्या भावना समजून घेता येतात, समस्या जवळून समजून घेता येतात, त्यांचा मित्र होता येते, अभ्यासक्रमातील विविध बाबी अगदी सहजपणे आनंददायी पद्धतीने मुलांपर्यंत पोहोचविता येतात, अगदी कठीण संकल्पना सुद्धा सोप्या पद्धतीने सांगता येतात हे महत्त्वाचे... अभ्यासाचा ताण झुगारून देऊन मुलांना व मला अभ्यासाचा आनंद घेता येतो.

लहान मुलांच्या भावविश्वामध्ये बाहुल्यांना अनन्यसाधारण महत्त्व असते, पण आजकाल या बाहुल्या खेळणे कमी झालेले आहे. पुरातन काळामध्ये गावागावांतून, गल्लीबोळांतून कळसूत्री बाहुल्यांचा खेळ करणारे फिरायचे असे माझी आजी सांगायची, पण आता मात्र ही कला अस्तंगत होत आहे. मला वाटते बाहुलीनाट्य कला जोपासून, तिचे संवर्धन करणे आवश्यक आहे. मला माझ्या या संपूर्ण प्रवासात साथ देणारे माझे कुटुंबीय आणि मित्रमैत्रिणी, अधिकारी गण आणि चाहत्यांची मी शतशः ऋणी आहे.

■■■

## वर्गणीदारांसाठी सूचना

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) आहे. आपली वर्गणी **'संपादक, जीवन शिक्षण, पुणे ३०'** या नावे **'स्टेट बँक ऑफ इंडिया'**च्या कोणत्याही शाखेत बचत खाते क्र. **11153675105** मध्ये भरावी. बँकेत पैसे भरल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत, स्वत:चा पूर्ण पत्ता, (पिनकोड द्यावा.) मोबाईल नंबर व ई-मेल आयडीसह पोस्टाने अथवा ई-मेलने jeevanshikshan@maa.ac.in वर पाठवावी. 'जीवन शिक्षण' ची वार्षिक वर्गणी अथवा पुस्तके मागणीसाठीचे पैसे मनीऑर्डरनेही स्वीकारले जातील.

# मुलांचे भावविश्व आणि बालसाहित्य

**समाधान शिकेतोड**
भ्रमणध्वनी : ९४२१०९८१३०

*मुलं वाचत नाहीत असा सूर अलीकडे सर्वत्र ऐकू येत असतो. वाचनाची गोडीच नसते म्हणून वाचत नाहीत. वाचनाची गोडी शाळकरी वयात लागायला हवी. त्यासाठी बालसाहित्य त्यांना उपलब्ध करून दिले पाहिजे. मुलांच्या परिसरातील, भावविश्वातील, त्यांच्या वयोगटानुसार असलेले आणि बालसुलभ वृत्तीला पोषक असे साहित्य, त्यांना वाचनाची गोडी लावल्याशिवाय राहणार नाही. अशा या बालसाहित्याविषयी...*

गेल्या अनेक वर्षांपासून मुलांसाठी खूप सारे लेखन केले गेले आहे. लीळाचरित्रात चक्रधरस्वामींनी रडणाऱ्या लहानगीला सांगितलेली गोष्ट, हे पहिले उपलब्ध बालसाहित्य. सानेगुरुजी, ग. दि. माडगूळकर, विं. दा. करंदीकर, दत्ता टोळ, अनिल अवचट, यदुनाथ थत्ते, मंगेश पाडगावकर, गिरीजा कीर, भा. रा. भागवत, गो. नी. दांडेकर, महावीर जोंधळे, बाबा भांड, विजया वाड, राजीव तांबे यांच्यापासून ते अगदी अलीकडील सुरेश सावंत, ल. म. कडू, एकनाथ आव्हाड, पृथ्वीराज तौर, दत्ता हलसगीकर, आबा महाजन, विशाल तायडे, फारूक काझी, नरेंद्र लांजेवार, बालाजी इंगळे अशा बालसाहित्यिकांची समृद्ध परंपरा आपल्याला लाभलेली आहे. या साहित्यिकांच्या लेखणीतून खूप दर्जेदार बालसाहित्य निर्माण झाले. आजही काही बालगीते, कविता आपल्या ओठांवर रेंगाळत आहेत.

मुलांचे भावविश्व समजून घेऊन त्यांच्यासाठी लिहिणे तसे अवघडच! निसर्गातील विविध घटनांबद्दल मुलांच्या मनात कुतूहल निर्माण होत असते. आकाशातील इंद्रधनुष्य पाहून मुले हरखून जातात, तर कधी विजांच्या कडकडाटाची भीती मनात धरून बसतात. भिरभिरणारी फुलपाखरे, चमचमणारा रातकिडा, पाण्यावरचे फुगे, अंगणातील चिऊताई हे सगळे त्यांना आवडायला लागते. चिमणी-कावळ्याच्या गोष्टीत मुले रमायला लागतात. आजूबाजूला घडणाऱ्या घटना, प्रसंग यांचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची क्षमता लहान मुलांमध्ये निर्माण झालेली असते. त्यामुळे मुलांना भोवताल खुणावत असतो. एखादे मूल लवकर बोलत नसेल तर जुनी माणसे म्हणायची, 'त्याला बाजारात घेऊन जा, लवकर बोलेल.' त्याच्या कानावर पडणाऱ्या विविध भाषा समजून घेऊन अर्थ लावण्याची त्याची क्षमता विलक्षण असते. त्यामुळे अगदी सुरुवातीच्या काळातील, मुलांना लिपी परिचय होण्याअगोदरचे बालसाहित्य मौखिक असते. गाणी, गोष्टी यांमधून मुलांचा भाषिक विकास होत असतो. मौखिक परंपरेने आलेले साहित्य आपण मुलांना सांगत असतो. त्या गोष्टी मुलांना आवडत असतात, पण आज संदर्भ बदलले आहेत. हे बदललेले संदर्भ लक्षात घेऊन मुलांसाठी गोष्टी लिहायला हव्यात. मुलांनी जे पाहिलेले नाही, अनुभवलेले नाही त्याबद्दल त्यांना गोडी वाटत नाही. अशा साहित्याच्या वाचनाने मुले तर्कशुद्ध विचार करू शकत नाहीत. त्यामुळे तहान लागलेला कावळा माठावर बसून खडे टाकतो, यापेक्षा तो कावळा कोल्ड्रिंकच्या दुकानात जाऊन कोल्ड्रिंक पीत बसतो याबद्दल मुलांमध्ये कुतूहल निर्माण होते.



२३ डिसेंबर : किसान दिन

अशा गोष्टी फँटसी जरी असल्या तरी त्यामध्ये त्यांच्या आजूबाजूच्या परिसराचे संदर्भ येत असतात. त्यामुळे मौखिक परंपरा काळानुसार बदलायला पाहिजेत.

बालवयात मुलांच्या मनावर चित्रे मोहिनी घालतात. त्यासाठी उत्तम चित्रकथांच्या पुस्तकांची निर्मिती व्हायला हवी. मुलांसाठी चित्रे काढणाऱ्यांची संख्या वाढायला हवी. मुले चित्रातील संदर्भ आपल्या जगण्याशी जोडून पाहत असतात. ती चित्रांविषयी भरभरून बोलतात. त्यांच्या भावविश्वाचा, परिसराचा विचार करून मुलांसाठी चित्रे काढायला हवीत. एखाद्या खेडेगावी भरलेल्या बाजाराच्या चित्राविषयी त्याच गावातील मुले भरभरून बोलतात. त्यामुळे त्यांच्या परिसरातील अनुभवविश्वावर चित्रकथांची पुस्तके तयार करायला हवीत. नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडियाने अशी चित्रकथांची उत्तम पुस्तके तयार केली आहेत. कार्टूनची चित्रे मुलांना खूप आवडतात. टी.व्ही.वरील कार्टूनच्या मालिका वेगळ्या भाषेत असूनही मुले आवडीने पाहत असतात. त्यामुळे मुलांसाठी लिहिताना अशा चित्रांचा वापर करायला हवा. आपण कुठल्या वयोगटासाठी लिहीत आहोत याची जाण ठेवून लेखकांनी बालसाहित्य लिहायला हवे. जेव्हा मुले कुमारवयात प्रवेश करतात, त्या वेळी त्यांना इसापनीती, परीकथा यांपेक्षा साहस कथा, विज्ञान कथा आवडायला लागतात म्हणून हॅरी पॉटर सारखे साहित्य वर्षानुवर्षे मुलांच्या मनावर अधिराज्य गाजवीत राहते. एका विशिष्ट वयापर्यंत मुलांना अद्‌भुततेची आवड असते परंतु किशोरवयीन मुलांना साहस कथांबद्दल आवड निर्माण होते.

बालमनाला सशक्त, सर्जनशील, कल्पक बनविण्याचे कार्य बालसाहित्य करीत असते. मुलांना वयाच्या विशिष्ट टप्प्यावर जी समज निर्माण व्हायला हवी, ती समज निर्माण करण्याचे काम बालसाहित्य करीत असते. बालसाहित्यातून भाषा, इतिहास, भूगोल, विज्ञान, कला, रंजन यांबाबतची माहिती वेगळ्या पद्धतीने मिळते. बालसाहित्य बालमनाला संवेदनशील बनवीत असते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्याचे काम साहित्य करीत असते म्हणून लहान मुले काय बोलतात, कसे बोलतात, याचे निरीक्षण सुद्धा साहित्य निर्मितीसाठी फलदायी ठरते. मुलांसाठीची पुस्तके केवळ मनोरंजनासाठी अशी लिहून चालणार नाही. मुले चिकित्सक, सर्जनशील विचार करतील असे कथानक, संवाद त्यांच्यासाठी लिहायला हवेत. मुलांनी एखाद्या घटनेवर, प्रसंगांवर, पात्रांवर आपले मत मांडायला हवे. त्यांच्या जडणघडणीमध्ये पुस्तके खूप मोलाची भूमिका पार पाडतात. ग्रामीण–शहरी, आदिवासी, वंचित घटकांतील मुलांचे जगणे बालसाहित्यातून यायला हवे. सर्वांच्या भावविश्वाचे प्रतिबिंब साहित्यातून दिसायला हवे.

जो समाज बालकुमारांची उपेक्षा करतो, तो आपल्या भविष्याची उपेक्षा करतो असे बालसाहित्यिक यदुनाथ थत्ते यांनी म्हटले आहे.

मोठ्यांनी मुलांसाठी लिहिलेले साहित्य याला आपण बालसाहित्य म्हणतो. त्याचबरोबर मुलांनी मुलांसाठी लिहिलेल्या साहित्याला बालसाहित्य म्हणून मान्यता मिळू लागली आहे. मुले कथा, कविता छान लिहू लागली आहेत. किशोरवयीन विद्यार्थी तर बालकादंबरी सारखा साहित्यप्रकार लिहीत आहेत. समाजाच्या बालसाहित्याच्या धारणेमध्ये आता बदल होत आहे. इयत्ता सहावीच्या पाठ्यपुस्तकामध्ये सोनाली फुपरे या विद्यार्थिनीची 'झाड' ही कविता आलेली आहे. शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या साहित्यकृतीबद्दल महाराष्ट्र शासनाचे राज्य वाङ्मय पुरस्कार सुद्धा मिळालेले आहेत. मुले बालसाहित्यातील वेगवेगळे प्रकार हाताळताना दिसत आहेत. मुलांनी लिहिलेल्या कथा, कविता दैनंदिनी, पत्रे, गीते यांमध्ये त्यांच्या जगण्याचे प्रतिबिंब दिसून येते. बालसाहित्यात मुलांच्या भावविश्वाचे प्रतिबिंब पडले तर ते अधिक दर्जेदार व वाचनीय होते.

# भित्तिपत्रकातून आपत्ती व्यवस्थापन

**रवींद्र जंगम**
जि. प. प्राथ. केंद्रशाळा निंबळक, जि. सातारा, भ्रमणध्वनी : ९८६०२२८६३३

*कुठेही चिकटविलेले पोस्टर, पत्रक दिसले की, मुलं-माणसं थांबून ते बघतात, मजकूर वाचतात. ही सहज प्रवृत्ती लक्षात घेऊन निंबळकच्या शाळेने महापुराच्या छायाचित्रांची भित्तिपत्रके बनविली. त्यातून या अस्मानी संकटाची भीषणता मुलांच्या नजरेस आणली. मुलांनी भित्तिपत्रके वाचून त्यावर विचार करावा म्हणून त्यांना एक प्रश्नपत्रिका सोडवायला दिली. या उपक्रमातून सामाजिक जाणीव तर निर्माण झालीच, शिवाय अशा वेळी पार पाडावयाच्या कर्तव्याचे भान आले. आपत्ती व्यवस्थापनाची गरज समजली त्याविषयी....*

मानवाने नैसर्गिक घटकांचा वापर करून आपले जीवन अधिक सुखद, सोईस्कर करून घेतले आहे. त्याने डोंगरदऱ्या, पर्वतशिखरे उल्लंघिली. सागरतळातून मूल्यवान संपत्ती मिळविली. अवकाशाची त्याला अनिवार ओढ आहे. बुद्धीच्या आणि कल्पकतेच्या जोरावर तो खूप काही करू पाहतोय. या वाटचालीत त्याने निसर्ग नियमांना अनुसरून वाट चालणे अपेक्षित होते, पण तसे घडले नाही.

ऑगस्ट, सप्टेंबर २०१९ च्या सुमारास सातारा, सांगली, कोल्हापूर इत्यादी भागांत अतिवृष्टी व महापुरामुळे जी अभूतपूर्व स्थिती उद्भवली, ती नक्कीच थरारक होती. शेकडो गावांनी हे अस्मानी संकट अनुभवले. गेल्या शंभर वर्षांत असे कधी झाले नसल्याचे सांगितले गेले. या भागात पावसाचा जोर वाढला, तसे हे महापुराचे प्रलयकारी संकट गडद झाले. याबाबत प्रसारमाध्यमांतून सविस्तर बातम्या येत होत्या. जे या अशा बाधित भौगोलिक स्थितीपासून कोसो दूर आहेत, त्यांनाही या अस्मानी संकटाच्या तीव्रतेबाबत जाणीव होणे महत्त्वाचे आहे.

'वैष्णव जन तो तेणे कहिए जो पीड पराई जाने रे' हे बोल अनमोल आहेत. दुसऱ्यांचे दु:ख दूर करणे ही नंतरची गोष्ट, पण त्या दु:खाबद्दल सहानुभूती असणे तितकेच महत्त्वाचे आहे. अतिवृष्टी, महापूर आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या संकटांबाबत मुलांना अधिक माहिती मिळावी यासाठी भित्तिपत्रकांच्या माध्यमातून प्रयत्न करावा असे मनात आले.

तसे पाहिले तर ही नैसर्गिक संकटे केव्हा दत्त म्हणून पुढे उभी राहतील हे सांगता येत नाही. फलटणसारख्या कमी पावसाच्या तालुक्यातही पावसाने विक्रमी हजेरी लावली. हवामान खात्याच्या अंदाजावरून अतिवृष्टीच्या शक्यतेने परिस्थिती लक्षात घेऊन स्थानिक प्रशासनाला येथील शाळांना सुट्ट्या जाहीर कराव्या लागल्या. बहुधा हे पहिल्यांदाच घडले असावे.

अतिवृष्टी, महापूर, पर्यावरणाचे असंतुलन अशा अनुषंगाने उपलब्ध लेख, माहिती, बातम्या यांची निवडक भित्तिपत्रके बनविण्याचे ठरविले आणि कामाला लागलो. ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टी दरम्यानच्या कालावधीतील वर्तमानपत्रे मला हवी होती. माझ्याकडे तीन दैनिके येतात, त्यातून हवे ते अंक बाजूला काढले. शिवाय वाचनालये, वृत्तपत्रवाचक,

दुकानदार, व्यावसायिक यांच्याकडून आवश्यक त्या दिवसांचे अंक मिळविले. कात्रणे काढली.

विविध रंगांची कार्डशीट्स घेऊन मुलांच्या मदतीने मोठ्या मथळ्यातील बातम्या, लेख, छायाचित्रे कमश: व्यवस्थित चिकटविली. आऊट लाईन्स काढल्या. जवळपास चाळीसहून अधिक भित्तिपत्रके तयार झाली.

शाळेत एका कार्यक्रमानिमित्त उभारलेला मंडप तयार होताच. त्यामुळे मुलांपर्यंत हा विषय व्यवस्थितपणे पोहोचविला जाईल, अशा बेताने मला हे प्रदर्शन मांडता येणार होते. सहकारी शिक्षकांनी या कामी मदत केली. कापडी कनातीवर भित्तिपत्रके व्यवस्थित लावून घेतली. महापुराचे अस्मानी संकट 'याचि देही याचि डोळा' अनुभवतोय अशी प्रचिती मुलांना येईल अशीच तयारी झाली होती.

निंबळक गावचे सरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, विद्यार्थी सारेजण प्रदर्शन पाहण्यात मग्न झाले. रेकॉर्ड ब्रेक मुसळधार पावसाने आलेला महापूर, ते अविश्रांत पडणारा पाऊस, ठप्प जनजीवन, अतिवृष्टीचे सद्य:स्थितीतील आणि दूरगामी परिणाम, मदत कार्यातील वेग, विविध सामाजिक संस्थांचा सक्रिय सहभाग, युद्धपातळीवरील रेस्क्यू ऑपरेशन असा अथपासून इतिपर्यंतचा प्रवास कमश: मांडलेला होता. वर्तमानपत्रातील पूर्ण पानावरील, अर्ध्या पानावरील रंगीत व बोलकी छायाचित्रे अत्यंत लक्षवेधक ठरत होती.

पाहुण्यांच्या उपस्थितीत झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात या प्रदर्शनाचे प्रयोजन स्पष्ट केले. केंद्र प्रमुख अलका जाधव यांनी 'नैसर्गिक व मानवनिर्मित संकटे', 'आपत्ती व्यवस्थापन आणि आपण' या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका शारदा निंबाळकर यांनी या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे वेगळेपण सांगून मुलांना प्रदर्शन कसे पहावे याची माहिती दिली. केवळ छायाचित्रे पाहत आणि बातम्यांचे मथळे वाचत पुढे पळायचे नाही असा मुलांसाठी दंडक घातला. मुलांनी सर्व भित्तिपत्रके व्यवस्थित वाचावीत, घडलेल्या घटनांपासून योग्य तो अर्थबोध घ्यावा, त्यांच्यातील शोधक वृत्ती, चिकित्सकपणा वाढावा, घडणाऱ्या घटनांमागील कारणांचा विचार केला जावा, या उद्देशाने त्यांनी हा दंडक घातला. काही गोष्टी वाचून मुलांनी स्वत:कडे त्याचे टिपण करून ठेवावे यासाठी एका फलकावर मध्यवर्ती ठिकाणी प्रश्नावली लावण्यात आली, ज्यायोगे मुलांनी स्वयंअध्ययनास उद्युक्त व्हावे. एका मुद्द्यातून दुसरा मुद्दा सहजपणे उलगडला जावा आणि विद्यार्थ्यांच्या जिज्ञासू वृत्तीला चालना मिळावी हा विचार यामागे होता.

मुलांना सुद्धा एका कागदावर तीच प्रश्नावली दिली.

१) आपल्या तालुक्यातून वाहणाऱ्या नद्या कोणत्या?
२) भित्तिपत्रकांचे वाचन करून किमान पाच धरणांची नावे लिहा.
३) कृष्णा नदी कोणकोणत्या राज्यांतून वाहते?
४) तुमचे लक्ष वेधून घेणाऱ्या, तुम्हांला आवडलेल्या पाच बातम्यांची शीर्षके लिहा.
५) महापुरामुळे बेघर झालेल्यांना मदत करणाऱ्या संस्थांची नावे लिहा.
६) धरणातील पाणीसाठा मोजण्याच्या टी.एम.सी या एककाचे विस्तारित रूप लिहा.
७) अतिवृष्टीमुळे कोणकोणत्या नद्यांनी पूररेषा ओलांडली?
८) अतिवृष्टी व महापुरामुळे बाधित झालेल्या भागांत कोणकोणत्या प्रकारचे नुकसान झाले?
९) तुमच्या मते महापूर येण्याची कारणे काय असावीत?
१०) महापुराचे संकट टाळण्यासाठी कोणते उपाय केले पाहिजेत असे तुम्हांला वाटते?

मुलांनी सर्व भित्तिपत्रकांचे काळजीपूर्वक वाचन केले. खरे तर वर्तमानपत्र वाचण्याची सवय या मुलांमध्ये कमी आहे, कारण इकडे एकतर ग्रामीण भागात अजूनही वर्तमानपत्र विकत घेऊन वाचण्याचा ट्रेंड नाही आणि एखाद्याच्या घरी येत असेल, तर मुले ते वाचत असतील का याची शंकाच आहे. क्रीडा वार्तेपलीकडे ती काही पाहत असतील असे वाटत नाही.

या प्रदर्शनाच्या निमित्ताने विविध वर्तमानपत्रे, त्यांची नावे, बातम्या देण्याची पद्धत, एकाच विषयाची बातमी देत असताना दोन वर्तमानपत्रांतून ती संस्कारित होऊन कशी प्रसिद्ध होते, हजार शब्दांचे काम करणारी बोलकी छायाचित्रे या काही गोष्टी अनायसे त्यांच्या पुढे आल्या.

प्रश्नावलीतील प्रश्न समजून घेऊन त्यावर लिहायचे होते. त्यासाठी भित्तिपत्रकांवरील बातम्यांचे पुन्हा पुन्हा वाचन करावे लागते होते. आम्ही सर्व प्रश्नांची उत्तरे वाचून लिहू शकतो, याबाबत मुलांमध्ये बराच आत्मविश्वास निर्माण झाल्याचे दिसून आले. काही प्रश्नांबाबत ती एकमेकांशी चर्चा करीत होती. मुले काय करतात, हे आम्ही सुलभकाच्या भूमिकेतून पाहत होतो.

महापुराची भीषणता, डोळ्यांत न मावणारी नद्यांची अक्राळविक्राळ रूपे, धरणातील पाण्याचा विसर्ग, वाहून गेलेली पिके, खरडून गेलेल्या शेतजमिनी, पाणी शिरलेली घरे, नद्यांवरील तुटलेले पूल, उखडलेले रस्ते, संपर्काबाहेर गेलेली गावे, खंडित वीजपुरवठा, ठप्प झालेले महामार्ग, जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा, पिण्याच्या पाण्याचे जलस्रोत व पाणी पुरवठा योजना यांचे झालेले नुकसान, त्यामुळे शुद्ध पाणी मिळविण्यात येत असलेल्या अडचणी, जीव धोक्यात घालून एन.डी.आर.एफ चे जवान आणि सेवाभावी संस्थांनी केलेले मदतकार्य, पुराच्या पाण्यात सापडून मृत झालेली शेकडो जनावरे व यातून झालेले पशुधनाचे नुकसान, बाजारपेठांतील शुकशुकाट, शेतीपूरक व्यवसायांना लागलेली घरघर, खचलेले डोंगर, भेगाळलेल्या जमिनी, पडझड झालेली घरे, विझलेल्या चुली, विस्कटलेले संसार अशा कितीतरी गोष्टी या प्रदर्शनातून अधोरेखित झाल्या. वेधक, बोलक्या छायाचित्रांमुळे मुले विषयाशी अधिक एकरूप झाली.

मुलांनी काढलेली पावसासंबंधी चित्रे व लिखाणही प्रदर्शनात मांडले होते. आमच्या निंबळक केंद्रातील मिंडवस्ती (साठे फाटा) येथील जिल्हा परिषद शाळेच्या मुलांनी या प्रदर्शनाला आवर्जून भेट देऊन माहिती घेतली.

### प्रदर्शनाची निष्पत्ती :

१) निसर्गविषयक जाणिवांची एक अखंड साखळी मुलांच्या मनात गुंफण्याचा प्रयत्न झाला.

२) परिसर आणि मानव यांचे निकटचे नाते असते हे समजले. या उपक्रमाद्वारे त्यासंबंधीच्या जाणिवा अधिक स्पष्ट झाल्या.

३) या उपक्रमातून मुलांना शिक्षणातून जीवनविषयक समज येणे हे ज्ञानरचनावादी शिक्षणपद्धतीचे सूत्र अनुभवता आले.

४) स्वयं-अध्ययनाकडे लक्ष देता आले.

५) विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाइतकाच सामाजिक, भावनिक आणि क्रियात्मक विकास महत्त्वाचा असल्याने अनेक मुलांना त्या अनुषंगाने संधी मिळाली.

६) तणावमुक्त वातावरणात शिक्षण झाले.

७) ज्ञान हे केवळ पुस्तकापुरते मर्यादित नसून, ते जीवनानुभवातून निर्माण होते आणि अविरत वाढत असते याची जाणीव झाली.

एकंदरीत आमचे हे नावीन्यपूर्ण असे भित्तिपत्रकांचे प्रदर्शन मुलांना अनेक अर्थांनी समृद्ध करणारे ठरले.

■■■

# माझी शाळा माझे उपक्रम

**भारती ओंबासे**
जि. प. प्राथ. शाळा दरावस्ती, जि. सातारा. भ्रमणध्वनी : ९२८४६३८६९८

२९ जून २०१९ या दिवशी माझी बदली माण तालुक्यातील अतिदुर्गम भाग तसेच 'अनफिट फॉर लेडीज' अशा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दरावस्ती (टाकेवाडी) या शाळेत झाली. सतोबाच्या डोंगराच्या पायथ्याशी असलेली अवघी १४ पटाची दरावस्ती शाळा. शाळेतील सर्व मुले धनगर समाजाची. अतिशय दुर्गम भाग. आईवडील मेंढरे घेऊन परगावी गेलेली. मुले मात्र शिक्षणासाठी आपल्या आजी-आजोबांसोबत गावातच शाळा शिकण्यासाठी राहिलेली. शाळा छान होती पण शाळेत यायला धड रस्ताच नाही. पावसाळ्यात एक दोन महिने तर दोन किलोमीटर दररोज पायी चालावे लागे. मुलांना शाळेबद्दल जराही गोडी नसलेली पाहून मला नवल वाटले. अभ्यास तर खूप लांबचा पल्ला होता. अभ्यास न करण्यामागची त्यांची नानाविध कारणे तयारच असायची. काय करावे सुचेना. पण मीही खूप जिद्दी. त्यातच गुणवत्तेचा ध्यास घेतलेली एक शिक्षिका. सोबत शाळेचे मुख्याध्यापक होतेच. काम करायचे तर याच मुलांना घेऊन असा विचार पक्का केला आणि कामाला लागले.

शाळेची वेळ तशी १०:३० ची तरी मी सकाळी ९ वाजताच शाळेत पोहोचत असे. सर्वप्रथम मुलांना मी बोलके केले. त्यांच्या मनातील शाळेबद्दलची भीती घालविली. त्यांना मोकळे केले आणि मग हळूहळू लेखन, वाचन, भाषापेटी, इंग्रजीपेटी, प्रोजेक्टर, संगणक, पीपीटी व अनेक मनोरंजक खेळांच्या माध्यमातून हसतखेळत अभ्यासाची गोडी लावली. माझा मोबाईल मुलांना हाताळायला दिला. सोबतच छोटे छोटे उपक्रम राबवायला सुरुवात केली. अगदी काही दिवसांतच शाळेने कात टाकायला सुरुवात केली. एकाच महिन्यात दहिवडीहून

> *दुर्गम भाग, प्रतिकूल परिस्थिती, पालकांची शिक्षणाविषयी अनास्था, पोटापाण्यासाठी दूरवर भटकंती करणारे पालक आणि आजी-आजोबांजवळ राहणारी मुले... अशी स्थिती असताना एका जिद्दी शिक्षिकेने मनावर घेतले आणि दरावस्ती शाळेने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली त्याविषयी....*

१० मुले शिक्षणासाठी दरावस्ती शाळेत दाखल झाली. दीड महिन्यातच १४ पटाची शाळा २४ पटावर गेली. ज्यादा मार्गदर्शनामुळे शाळेतील सर्व मुले प्रगत झाली. त्यामुळे अतिदुर्गम भागातील पहिली अप्रगतहीन शाळा म्हणून माझ्या शाळेची ख्याती झाली. यासाठी माझ्या 'सहमित्र' या उपक्रमाचा मला खूप फायदा झाला. मुले आपली मते, समस्या, अडचणी शिक्षकांपेक्षा मित्रांना लगेच सांगतात हे लक्षात घेऊन दोन दोन मुलांच्या जोड्या केल्या. त्यात ते एकमेकांचा अभ्यास घ्यायचे, प्रश्न विचारायचे, उदाहरणे सोडवायचे, इंग्रजी संभाषण करायचे त्यामुळे त्यांच्यात मुक्त संवाद साधला गेला आणि त्यांची शैक्षणिक प्रगती वेगाने झाली. यामध्ये माझी भूमिका ही फक्त 'वाटाड्या' म्हणजे मार्गदर्शक अशीच होती. मुलांचा चांगला प्रतिसाद पाहून त्यांना स्पर्धा परीक्षेला बसवायचे ठरविले. त्यासाठी शाळेतील अभ्यासाला स्पर्धा परीक्षेची जोड दिली तर मुलगा कधीच मागे पडणार नाही, तसेच रोज नवीन काहीतरी शिकेल असे पालकांचे उद्बोधन केले. २४ पटापैकी १४ मुले मंथन, बीडीएस व अक्षरगंगा परीक्षेस बसविली. इयत्ता चौथीची शिष्यवृत्ती परीक्षा आता पाचवीला असल्याने माझ्या मुलांची गुणवत्ता पालकांना समजावी म्हणून हा निर्णय घ्यावा लागला. मी रहायला दहिवडी येथे असल्याने रविवारी व सुट्टीच्या

दिवशी शाळेत जाणे शक्य नव्हते. त्या वेळी माझ्या डोक्यात एक कल्पना सुचली. मी दिवाळीनंतर दर शनिवार व रविवार शाळेतील मुले माझ्या घरीच मुक्कामी घेऊन जाऊ लागले. दोन दिवस माझ्या घरीच त्यांची तयारी करून घेऊ लागले. सोमवारी ती मुले माझ्यासोबत शाळेला जाऊ लागली. हा नेहमीचा कार्यक्रम सुरू झाला. अशी झपाटून कामाला लागले. पालक, सहकारी शिक्षक व सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांनी मला खूप साथ दिली. गुणवत्तेत तर मुले पुढे सरकत होतीच, पण इतर उपक्रमांतही काही कमी नव्हती. माण तालुक्यातील १५० ते २०० प्राथमिक शाळांमध्ये अवघ्या २४ पटाच्या अतिदुर्गम भागातील आमच्या दरावस्ती शाळेने स्व. यशवंतराव चव्हाण व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धेत तालुक्यात लोकनृत्य, पोवाडा व बालनाट्य स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला आणि आमची जिल्ह्याला निवड झाली. यामुळे माझा आणि माझ्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढत गेला. माझे अंतर्मन मला म्हणाले, " Yes,.....you can do it."

ग्रामीण भागातील मुले गरीब असतात. त्यांना सहजासहजी कोणतेही शैक्षणिक साहित्य उपलब्ध होत नाही आणि ते मागायलाही संकोच करतात. अशा मुलांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता त्यांच्यासाठी काही शैक्षणिक साहित्य कसे उपलब्ध करून देता येईल यासाठी एक अभिनव उपक्रम राबविला, तो म्हणजे 'शैक्षणिक दहीहंडी'. यामध्ये शाळेतील सर्व मुलांच्या 'शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन, त्यांना लागणाऱ्या वस्तू विद्यार्थी संख्येच्या दुप्पट खरेदी केल्या. शैक्षणिक दहीहंडीत त्या वस्तू टाकल्या आणि ती दहीहंडी मनोरंजनात्मक कार्यक्रम घेऊन फोडली. त्यातून खाली पडलेले साहित्य, वस्तू त्या त्या विद्यार्थ्याला मिळेल याची काळजी घेतली. त्यामुळे गरजू मुलांना ते साहित्यही मिळाले आणि शिक्षणात एक मनोरंजकता आल्याने आनंददायी शिक्षण हा हेतूही साध्य झाला.

माझ्या कार्याची दखल घेऊन मला या वर्षीचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन माझा गौरव केला गेला. त्यामुळे माझ्या शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला. या सन्मानामुळे मला आणखी उंच भरारी मारण्याची प्रेरणा मिळाली आणि आणखी झपाटून कामाला लागले. जादा तासिकेमुळे मुले चांगली घडत होती. जी मुले मेंढरांकडे जायची, सतत शाळा सोडून घरीच रहायची ती आता शाळेतच रमायला लागली. गणित, इंग्रजी, मराठी, परिसर अभ्यास यांबरोबरच बुद्धिमत्ता, स्पर्धा परीक्षेची चढाओढ सुरू झाली. आज इ. २ री ते ४ थी ची मुले सम, विषम, मूळ, संयुक्त या संख्या, अपूर्णांक, भूमिती, नाणी, नोटा, मापन, दिशा, वय, सांकेतिक भाषा, तर्कसंगती, अनुमान, दिनदर्शिका... इत्यादी सर्व घटकांवरील उदाहरणे चुटकीसरशी सोडवितात. इंग्रजी वाचन करतात. मोबाईल, संगणक हाताळतात, गोष्टी सांगतात. आज जादा मार्गदर्शनामुळे १४ पैकी १४ मुले मेरीटमध्ये येतील असा मला विश्वास आहे. शहरातील मुले तर शिकतीलच, पण माझे स्वप्न होते माझी दऱ्याखोऱ्यातील मुले शिकली पाहिजेत. ते पूर्ण होताना पाहून मला मनस्वी आनंद वाटत आहे.

मी माझ्या शाळेत वर्षभर राबवीत असलेले काही निवडक उपक्रम ज्यामुळे माझ्या शाळेने कात टाकली.

**माझे उपक्रम :** एक विद्यार्थी एक कुंडी, जो वार तो पाढा, प्रश्नमंजूषा, दप्तरमुक्त शाळा, मी मोठा झालो (वाढदिवस साजरा करणे), वृक्षदिंडी, श्रावणी सहल, नवागत स्वागत, जलदिंडी, शिक्षणाची पालखी, आजचा वार आरोग्याचा (गुरुवार), अनोखे रक्षाबंधन, वारकरी दिंडी, भोंडला, आम्ही सावित्रीच्या लेकी (साडी डे), शैक्षणिक दहीहंडी, मित्र उपक्रम, बालानंद मेळावा, आमची कलाकृती (आकाशकंदील बनविणे), आम्ही मावळे शिवबाचे (किल्ला बांधणे), स्मरण करू या थोरांचे (नेते आणि समाजसुधारक यांची जयंती, पुण्यतिथी साजरी करणे), वर्गसजावट, आम्ही पण लिहितो (शिक्षक मित्रांना), मी असतो नेहमी हजर (१००% उपस्थिती), सण माझा वारसा (सण साजरे करणे), हळदी- कुंकू (मातापालक व शिक्षक पालक समन्वय), परिसर भेट , ज्यादा तासिका, Friday is conversation day इत्यादी. माझ्या मते विद्यार्थी मेरीटमध्ये येणे म्हणजे हुशार असे नाही तर कालच्यापेक्षा त्याला आज काय जास्त येते ते महत्त्वाचे.



२७ डिसेंबर: भूतपूर्व कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख जन्मदिन १८९८

## प्रिय संपादक ....

माहे ऑक्टोबर २०२० चा ‘जीवन शिक्षण’ चा अंक सर्व शिक्षक मित्रांना प्रेरणादायी आहे. परमपूज्य महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री आणि भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे जन्मदिवस या महिन्यात आहेत. त्यांच्या जयंती निमित्ताने या थोर व्यक्तींचे संदेश यात वाचायला मिळाले.

कार्यानुभवासारख्या विषयातून मुलांच्या कला–गुणांची जोपासना करणे, त्यांचे सुप्त गुण ओळखून त्यांना त्या त्या क्षेत्रात संधी देणे यादृष्टीनेही अंकातील लेखांमधून मार्गदर्शन मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या विकासासाठी धडपडणाऱ्या शिक्षकांना निश्चितच दिशा मिळते.

या अंकाच्या ‘संपादकीय’ मध्ये परिषदेचे संचालक मा. दिनकर पाटील यांनी महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री व डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या कार्याची माहिती दिली आहे. तसेच जगातील सर्व मोठ्या व्यक्ती मोठ्या होण्याचे एकमेव कारण म्हणजे वाचन हे आहे असे सांगत त्यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त Light From Many Lamp's हे लिलियन इचलेर वॉटसन चे पुस्तक वाचावे असे सुचविले आहे.

महाराष्ट्र राज्य अपर मुख्य सचिव मा. वन्दना कृष्णा यांची मुलाखत प्रेरणादायी आहे. आज बहुविध दृष्टी निर्माण करणारे शिक्षण आवश्यक आहे. सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. शिक्षणापुढील आव्हाने, ग्रामविकास विभाग, शालेय शिक्षण विभाग, सामाजिक विभाग यांच्याकडून शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी होणारे प्रयत्न, शिक्षण विभागातील रिक्त पदे, शिक्षक प्रशिक्षण, या विषयांवर डॉ. किरण धांडे यांनी विचारलेल्या प्रश्नांना मुलाखतीत सुस्पष्ट विचार मांडणारी उत्तरे वाचायला मिळाली.

युवकांचे सबलीकरण या लेखातील दोन्ही फोटो प्रेरणा व ऊर्जा देणारे आहेत. तंत्रज्ञान व संशोधन या बद्दलची माहिती युवकांना कार्यप्रवण करण्याच्या दृष्टीने उत्तम आहे. ‘मी करू शकतो’ हे वाक्य विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणारे आहे. अपयशाने खचून जायचे नाही हा विश्वास मुलांच्या मनात निर्माण करण्याचे कार्य शिक्षकांनी करावे हा संदेश या लेखातून दिला आहे.

या अंकात आलेले सर्वच लेख वाचनाची प्रेरणा देणारे आहेत. विद्यार्थी व शिक्षकांना मोलाचे मार्गदर्शन करणारे व ज्ञानात भर घालणारे आहेत. याबद्दल ‘जीवन शिक्षण’ संपादक मंडळाला मनःपूर्वक धन्यवाद. ‘जीवन शिक्षण’ कडून या पुढेही असाच नावीन्यपूर्ण माहितीचा खजिना व प्रेरणादायी मार्गदर्शन मिळत राहो हीच अपेक्षा.

**देवेंद्र गाठे**
जि. प. प्राथमिक शाळा दिंदोडा,
पं. स. सेलू, जि. वर्धा.

’जीवन शिक्षण’ हे मासिक, मालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांच्यासाठी मुद्रक व प्रकाशक राहुल द्विवेदी यांनी रुना ग्राफिक्स, त्रिमुर्ती हॉस्पिटलमागे, वडगांव बु.।। सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१ येथे छापून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : राहुल द्विवेदी (भा.प्र.से.)

'Jeevan Shikshan' monthly magazine owned by Rajya Shaikshanik Sanshodhan Va Prashikshan Parishad, Maharashtra by Printer and Publisher Rahul Dwivedi printed at Runa Graphics, Behind Trimurti Hospital, Vadgaon Bk., Sinhagad Road, Pune 411 041 and Published at Rajya Shaikshanik Sanshodhan Va Prashikshan Parishad, Maharashtra, 708, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune 411 030. Editor : Rahul Dwivedi (I.A.S.)


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
दुरूनच हॅलो हाय करू या.
एकमेकांना स्पर्श टाळू या.
कोरोनापासून
वाचायचे आणि वाचवायचे आहे.
एक आदर्श उदाहरण बनायचे आहे.
आदर्श आणि मिसालचे म्हणणे ऐकू या.
सोबत राहून कोरोनाला
हद्दपार करू या.


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
योग्य वेळी हात धुवा.
कोरोनावर मात करा.
कोरोनापासून
वाचायचे आणि वाचवायचे आहे.
एक आदर्श उदाहरण बनायचे आहे.
आदर्श आणि मिसालचे म्हणणे ऐकू या.
सोबत राहून कोरोनाला
हद्दपार करू या.


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
आपला मास्क आपणच लावू या.
कोरोना पासून दूर राहू या.
कोरोनापासून
वाचायचे आणि वाचवायचे आहे.
एक आदर्श उदाहरण बनायचे आहे.
आदर्श आणि मिसालचे म्हणणे ऐकू या.
सोबत राहून कोरोनाला
हद्दपार करू या.


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
आपल्या वस्तूंचे ना शेअरिंग करू.
एकमेकांना सुरक्षित ठेवू.
कोरोनापासून
वाचायचे आणि वाचवायचे आहे.
एक आदर्श उदाहरण बनायचे आहे.
आदर्श आणि मिसालचे म्हणणे ऐकू या.
सोबत राहून कोरोनाला
हद्दपार करू या.

Date of Publication 3 December 2020
Jeevan Shikshan Magazine is posted
on 22nd of December 2020
at Pune PSO, G.P.O. Pin 411 001.

'Registered'

Reg. No. RNI - 14563/1957
Post Registration No.: PCW/063/2018-2020
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**

# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## नवीन प्रकाशने







पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०–२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०–२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

प्रति ____________________